पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १९३ ■ सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 /49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# कमळाला तुतारीची साथ ?

## सत्ता स्थापनेच्या मुंबईत हालचालींना वेग



प्रतिनिधी १९ जानेवारी

**अकोला:** भारतीय जनता पार्टीचे नेते ज्यांच्या विरोधात रोज शंख करत टिका करतात त्या तुतारीच्या सोबत अकोल्यात बसण्याची चिन्हं निर्माण झाली आहे. यासाठी मुंबईत प्राथमिक स्तरावरची चर्चा रंगल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

सत्ता स्थापनेत अपुऱ्या संख्याबळामुळे कमळाला तुतारीची साथ लाभण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याची माहिती राजकीय सूत्रांनी दिली आहे. उपमहापौर हे कमी महत्वाचे पद आणि स्थायी समितीत दरवर्षी एक एक सदस्य असे काय ते गणित निश्चित होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून त्या आधारे भाजप सत्ता स्थापनेसाठी अग्रेसर असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या विजयी उमेदवारांना सोबत घेण्याच्या हालचालींना वेग आल्याची माहिती आहे. अकोला महापालिकेत भाजपच्या जागा कमी होत ३८ वर स्थिरावल्या आहे. निवडणुक पुर्व आघाडी झालेल्या राष्ट्रवादी (अजित पवार) आणि महानगर विकास आघाडी अशा दोन जागा भाजप सोबत आहे की नाही याची खातरजमा होत नसताना आता थेट राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार ) यांच्या तीन नगरसेवकांना गळाला लावण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. एकूणच सत्ता समीकरणात भाजप अग्रेसर असून काँग्रेसची सत्ता अकोल्यात होण्याची शक्यता आता धुसर झाली आहे. मुंबईत या विषयावर आज अंतिम निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अकोला महापालिकेत भाजप सह राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांची सत्ता आल्यास ४१ हा जादूई आकडा आपोआप पार पडण्याची शक्यता वाढली आहे.

### मिश्रांना पाडण्यासाठी गेले पण

राजकारणात स्वतःची रेष मोठी करण्याची गरज असते. पण, तसे केले नाही तर आपली रेष कधी छोटी होईल याची कल्पना कोणीच करु शकत नाही. असाच काय तो अनुभव अकोल्यात आला. शिवसेना नेते राजेश मिश्रा या हिंदूत्व जपणाऱ्या उमेदवाराला पाडण्यासाठी इतकी ताकद भाजपाने लावली की स्वतःच्या दहा जागांवर त्यांना पाणी सोडावे लागल्याचे चित्र आहे. इतकेच नाही तर जुने शहरात विशिष्ट जातीचे उमेदवार विजयी कसे झाले आणि इतर पराभूत कसे झाले याची जोरदार चर्चा रंगली आहे. कोणी कोणाला पाडायचे आदेश दिले होते काय अशी विचारणा आता सुरु झाली आहे. महायुती म्हणून लढले असते तर सहा जागांवर भाजपला विजय प्राप्त झाला असता पण, तसे झाले नाही. त्यात मिश्रांना पाडण्यासाठी गेले आणि दहा जागांवर पाणी सोडवे लागल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

### काँग्रेस नेत्यांची कागदावर सत्ता ?

काँग्रेस नेत्यांची कागदावर सत्ता येणार असल्याचे चित्र आहे. केवळ आम्ही सत्ता स्थापन करत आहोत अशा वल्गना करण्यात काँग्रेस नेते आघाडीवर असून त्यांच्या पुर्वीच सत्ता समीकरणात भाजप अग्रेसर झाल्याची माहिती प्राप्त झाली असून भाजपला तुतारीची साथ मिळाल्यास काँग्रेसला मोठा धक्का मानला जाईल. इतकेच नाही तर ज्या नगरसेवकांच्या आधारावर काँग्रेस नेते सत्तेची स्वप्न पाहत होती ती आज तरी भंग झाल्याचे चित्र समोर आले आहे.

# विजयाच्या गुलालाने प्रस्थापितांच्या अहंकाराचा चकनाचूर !

प्रतिनिधी १९ जानेवारी

**अकोला :** राजकारणातील खुन्नस जेव्हा वैयक्तिक पातळीवर उतरते, तेव्हा लोकशाहीचा कसा गळा आवळला जातो, याचा संतापजनक अनुभव अकोल्यात पाहायला मिळाला. एका उमेदवाराला कोणत्याही परिस्थितीत पाडण्याचा चंग बांधलेल्या राजकीय धुरिणांनी प्रशासकीय आणि तपास यंत्रणांना आपला गुलाम बनवले होते. मात्र, अकोल्याच्या स्वाभिमानी जनतेने ईव्हीएमच्या एका बटणातून असा दणका दिला की, ज्याला पाडण्याचे स्वप्न पाहिले होते, तोच 'भाऊ' आता थेट महापौरपदाच्या शर्यतीत 'किंगमेकर' ठरला आहे.



सर्व यंत्रणा, पैसा आणि सत्तेचा गैरवापर करूनही जनतेने या दडपशाहीला धुडकावून लावले आहे. आज परिस्थिती अशी आहे की, ज्याला संपवायचे होते, त्याच्याशिवाय कोणाचेही सरकार किंवा महापौर होणे अशक्य आहे. हा निकाल म्हणजे राजकारणातील 'गैरवापर' करणाऱ्यांसाठी मोठी चपराक आहे.

निवडणूक प्रक्रियेला काळिमा फासणाऱ्या त्या सर्व शासकीय अधिकाऱ्यांची आणि दबावाचे राजकारण करणाऱ्या नेत्यांची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. लोकशाही वाचवण्यासाठी अकोल्यातील या 'सूडनाट्याचा' सूत्रधार कोण, हे समोर आलेच पाहिजे.

### प्रशासकीय लाचारी की राजकीय गुलामगिरी?

राजकीय नेत्यांनी या निवडणुकीत सुडाचे राजकारण पराकोटीला नेले. केवळ उमेदवारी नाकारून समाधान झाले नाही, तर संबंधित उमेदवाराच्या मागे तक्रारींचा ससेमिरा लावला गेला. शासकीय आणि निवडणूक यंत्रणा राजकीय दबावाखाली इतकी झुकली होती की, त्यांनी उमेदवाराला 'सळो की पळो' करून सोडले. उमेदवाराच्या घराला तपास यंत्रणांनी घातलेला गराडा हा निव्वळ योगायोग होता की नेत्यांच्या आदेशाचे पालन त्यांनी केले याची ही चौकशी होण्याची गरज आहे.

### लोकशाहीला काळीमा फासणारा प्रयोग!

निष्पक्ष निवडणुका घेण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, तीच यंत्रणा जेव्हा एका उमेदवाराला त्रस्त करण्यासाठी वापरली जाते, तेव्हा लोकशाहीचा पाया हादरतो. केवळ एकाच उमेदवाराला आचारसंहितेच्या नावाखाली लक्ष्य का केले गेले? तपास यंत्रणांना घराबाहेर उभे राहण्याचे आदेश कोणी दिले? हे प्रश्न आता ऐरणीवर आले आहेत. फेसबुक पोस्ट डिलीट करण्यापासून ते प्रत्येक हालचालीवर पाळत ठेवण्यापर्यंत खालची पातळी गाठली गेली. 'नेते म्हणतील ती पूर्व दिशा' या थाटात प्रशासनाने दिलेले झुकते माप अकोल्याच्या इतिहासातील काळा डाग ठरले आहे.

# नागपुरात लोकसभेच्या तुलनेत महापालिका निवडणुकीत भाजपसह काँग्रेसचे मतदान घटले!

## छोट्या पक्षांसह अपक्ष अन् बंडखोरांचा फटका?




प्रतिनिधी १९ जानेवारी

**नागपूर :** अवघ्या महाराष्ट्राचं लक्ष लागलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या होमपीचवर, अर्थात नागपूर महापालिकेत भाजपने गेठं बहुमत मिळवत घवघवीत यश मिळवलं आहे. सोबतच नागपूर महापालिकेवर एकहाती सत्ता स्थापन करण्याचा मार्गही जवळजवळ मोकळा झाला आहे. नागपूर महापालिकेच्या १५१ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपने १०० हून अधिक जागांवर विजय मिळवत बहुमत मिळवलं आहे. मात्र दुसरीकडे नागपुरात लोकसभेच्या तुलनेत महापालिका निवडणुकीत भाजप आणि काँग्रेस दोघांचे मतदान तब्बल एक लाखांनी कमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

यंदा महापालिका निवडणुकीमध्ये नागपुरात १२ लाख ७७ हजार ३०६ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी भाजपला ५ लाख ३१ हजार मते मिळाली आहे. तर काँग्रेसला ४ लाख १७ हजार मते मिळाली आहे. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीत नागपुरात १२ लाख ७ हजार ७३८ एवढे मतदान होऊनही भाजप उमेदवार नितीन गडकरी यांनी तब्बल ६ लाख ५५ हजार मते घेतली होती. म्हणजेच गडकरींच्या लोकसभेच्या मतांच्या भाजपने महापालिका निवडणुकीत १ लाख २४ हजार मते कमी घेतली आहे. तर लोकसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवार विकास ठाकरे यांनी ५ लाख १४ हजार मते घेतली होती त्या तुलनेत महापालिका निवडणुकीत काँग्रेसला ४ लाख १७ हजार मते मिळाली आहे. म्हणजेच लोकसभेच्या तुलनेत काँग्रेसच्या मतांमध्ये १ लाखांची घट झाली आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

प्रतिनिधी १९ जानेवारी

**खामगाव :** मलकापूर राष्ट्रीय महामार्गावर रस्ता ओलांडताना अज्ञात वाहनाच्या धडकेत एका पादचाऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवारी सायंकाळी राष्ट्रीय महामार्ग ५३ वर घडली. अपघातानंतर संबंधित वाहन चालकाने घटनास्थळावरून पोबारा केला.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मीनगर येथील रहिवासी अनिल एकनाथ मालठाणे (४५) हे महाबीजमध्ये कार्यरत होते. काम आटोपून ते सायंकाळी घरी परतले होते; मात्र कामानिमित्त पुन्हा बोलावणे आल्याने त्यांनी त्यांची दुचाकी महामार्गाच्या उत्तर दिशेला उभी करून पायी रस्ता ओलांडण्यास सुरुवात केली. त्याच वेळी नागपूरकडून मुंबईकडे भरधाव जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी तीव्र होती की, मालठाणे हे सुमारे १५ ते २० फूट हवेत उडून रस्त्यावर कोसळले. डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच, लक्ष्मीनगर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला असून, पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. काही नागरिकांनी दसरखेड टोलनाक्यावर चौकशी करण्याची मागणी केली. दरम्यान, ही घटना महाबीजच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याची माहिती असून, पोलिस अज्ञात वाहनाचा शोध घेत आहेत.

# मुंबई महापौरपदावरून जोरदार रस्सीखेच !

## भाजपने उद्धव ठाकरेंशी चर्चा केल्याची माहितीने खळबळ

प्रतिनिधी १९ जानेवारी

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजप शिंदे गटाला काठावरचं बहुमत मिळाल्याने महापौरपदाचा पेच मात्र भलताच वाद चालला आहे. शिंदे आणि भाजपमध्ये एकमेकांवर वार पलटवार आणि जोरदार रस्सीखेच महापौरपदावरून सुरू झाला आहे. त्यामुळे आता आपण महापौर भाजपचा होणार की शिंदेंना संधी दिली जाणार? याबाबत मात्र चर्चा रंगल्या आहेत. दुसरीकडे ही चर्चा असतानाच दुसऱ्या बाजूने भाजपने बॅक डोअर उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केल्याची बातमी एका दैनिकात छापून आल्यानंतर शिंदे यांचा गेम करण्याचा प्रयत्न आहे का? अशी सुद्धा चर्चा आहे. मात्र, या सर्व चर्चांना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पूर्णविराम दिला आहे. या प्रकारच्या बातम्यांमध्ये तथ्य नसल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांची मुंबई महापौर पदावरून चर्चा झाल्याची बातमी वर्तमानपत्रात आली आहे. मात्र, कुठलीही चर्चा झाली नसल्याचा उद्धव ठाकरे यांच्याकडून खुलासा करण्यात आला. महापौर निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरे यांचे नगरसेवक गैरहजर होऊन भाजपला सोयीस्कर भूमिका घेणार असल्याची चर्चा होती. मात्र, या चर्चेमध्ये तथ्य नसल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. दुसरीकडे, आज शिवसेना खासदार संजय राऊत यांनी आमची कुठलीही चर्चा झाली नसल्याचे सांगितले. ते म्हणाले की, या सगळ्या बातम्या वृत्तपत्रांमधील आहेत. आम्ही सूत्रांवर विश्वास ठेवत नाही, असं राऊत यांनी सांगितलं. महापौर कोणाला करायचं हे भाजप आणि गौतम अदानी



ठरवतील, असाही संजय राऊत यांनी टोला लगावला. ज्या पद्धतीने मुंबईमध्ये आकडे आले आहेत त्यानुसार भाजपने विजय साजरा करण्याचा प्रयत्न केला तरी तो विजय नाही असे ते म्हणाले. शिंदेंना महापौर पदासाठी दिल्लीतून चावी दिली जात आहे. मात्र, मुंबईत भाजपने विशेषत: देवेंद्र फडणवीस यांचा महापौर होऊ नये, यासाठी दिल्लीतून प्रयत्न सुरू आहेत असेही राऊत यांनी म्हटलं आहे.

# ...तर 40 जणांचे नगरसेवकपद जाणार ?

## ▸▸चेंडू सर्वोच्च न्यायालयाच्या कोर्टात ▸▸सर्वांच्या नजरा लागल्या 21 जानेवारीच्या सुनावणीकडे!

प्रतिनिधी १९ जानेवारी

**नागपूर :** अलीकडेच झालेल्या नागपूर महापालिकेच्या निवडणुकीमध्ये ४० नगरसेवक ओबीसी आरक्षित प्रवर्गातून निवडून आले. मात्र, एकूणच नागपूर मनपामधील आरक्षणाची मर्यादा ओलांडली असून सर्वोच्च न्यायालयाच्या जुन्या निकालाचा संदर्भ लावल्यास या सर्व ४० जागांवरील निवडणुका रद्द होऊन तेथे पोटनिवडणुका होऊ शकतात; किंवा केवळ एकावेळेसचा अपवाद म्हणून न्यायालय या निवडणुका वैधही ठरवू शकते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी पूर्ण करा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले होते. यात नगरपरिषद व नगरपंचायती व महापालिकेच्या निवडणुका झाल्या. आता राज्यातील १२ जिल्हा परिषद तसेच पंचायत समित्यांच्या निवडणुका ७ फेब्रुवारी रोजी होणार आहेत. इतर जिल्हा परिषदांमधील निवडणुका अद्याप घोषित करण्यात आलेल्या नाहीत. या जिल्हा परिषदांमधील आरक्षणाची मर्यादा ओलांडली असल्याने तेथे निवडणुका घोषित करण्यात आलेल्या नाहीत. मात्र, आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या नागपूर व चंद्रपूर मनपामध्ये निवडणुका झाल्या. अशात ओबीसी आरक्षणावरील मुद्यावर २१ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणे अपेक्षित आहे. या सुनावणीत आरक्षण मर्यादा ओलांडण्यात आलेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांबाबत न्यायालय निर्णय देईल, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी इच्छुक असलेल्यांचे या सुनावणीकडे लक्ष लागले आहे. २०२१ सालच्या न्यायमूर्तीद्वय ए. एम. खानविलकर आणि जे. के. माहेश्वरी यांच्या निकालाचा संदर्भलक्षात घेता शहरातील ४० जागांवरील आरक्षण रद्द होऊन त्यांच्या निवडणुकाही रद्द होऊ शकतात, असा अंदाज काही वरिष्ठ विधिज्ञ नाव न सांगण्याच्या अटीवर व्यक्त करीत आहेत. मात्र, तसे झाल्यास राज्यातील दोन मनपा व अनेक नगरपरिषदा तसेच नगरपंचायतींमधील ओबीसी आरक्षण रद्द करून सगळीकडेच नव्याने निवडणुका घ्याव्या लागतील, तसे झाल्यास राज्य सरकारवर मोठ्या खर्चाचा बोझाही लादला जाईल व हा जनतेचाच पैसा असेल. त्यामुळे यंदा केवळ एकावेळेसचा अपवाद म्हणून न्यायालय या निवडणुका रद्द करणारा नाही. मात्र, यापुढे आरक्षणाची मर्यादा न ओलांडताच निवडणुका घ्याव्यात, असे सक्त आदेश देईल, असाही अंदाज काही ज्येष्ठ विधिज्ञ वर्तवित आहेत.

# बुधवारी निघणार महापौर आरक्षणाची सोडत ?

प्रतिनिधी १९ जानेवारी

**अकोला :** महापालिकेची निवडणूक व मतमोजणी झाल्यानंतर सर्वांना प्रतीक्षा होती ती महापौर पदाच्या आरक्षणाची आता ती प्रतीक्षाही संपण्याची शक्यता असून, बुधवारी ही आरक्षण सोडत निघणार असल्याची माहिती आहे.

महानगरपालिकेचा निकाल लागताच सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. मात्र इच्छुकांचे लक्ष महापौर आरक्षण सोडतीकडे लागले होते. साधारण निवडणुकीच्या आधी महापालिका आरक्षण सोडत काढली जाते. शासनाच्या नगर विकास मंत्रालयात ही आरक्षण सोडत बुधवारी निघण्याची शक्यता आहे. महापालिका निवडणुका पार पडल्यानंतर शासन पातळीवर महापालिकेच्या महापौरपदाच्या आरक्षण सोडतीची तयारी सुरू आहे.

शहरातील नेते व पदाधिकारी महापौर पदाचे आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी राखीव निघणार याचे अंदाज बांधत आहेत. चक्रानुक्रमे पद्धतीने सोडत काढल्यास महापौरपद कोणत्या प्रवर्गाकरिता आरक्षित होऊ शकते. तसेच चिठ्ठी पद्धतीने आरक्षण सोडत काढल्यास कोणत्या प्रवर्गातील सदस्याला संधी मिळू शकते, याचे अंदाज बांधण्यात येत आहेत.

### ८० उमेदवारांची अधिकृत यादी तयार, प्रस्ताव शासनाकडे सादर

महानगरपालिकेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा राज्य निवडणूक आयोगाकडून निवडून आलेल्या ८० उमेदवारांची अधिकृत यादी तयार करण्यात आली आहे. या यादीत उमेदवाराचे नाव, प्रभाग क्रमांक, आरक्षणाचा प्रकार आणि पक्ष अथवा अपक्ष अशी माहिती नमूद केली आहे. प्रमाणित यादी मनपाकडून एक ते दोन दिवसांत शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठविली जाणार आहे. मनपा आयुक्तांमार्फत आवश्यक कागदपत्रांसह हा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

# एकनाथ शिंदेंची नाराजी कोणाची विकेट घेणार?

प्रतिनिधी १९ जानेवारी

**मुंबई :** २९ महापालिकांमध्ये शिवसेना ठाकरे गटाची कामगिरी फारशी साजेशी झालेली नसून एकनाथ शिंदे यांना जेवढं यश अपेक्षित होतं ते न मिळाल्यामुळे उपमुख्यमंत्री नाराज असल्याची चर्चा आहे. जिथे जिथे पदरी अपयश आलं तिथल्या स्थानिक नेतृत्वाची भाकरी फिरवण्याच्या तयारीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आहेत असेही समजत आहे. त्यामुळे अनेकांची धाकधूक वाढली आहे. मुंबईसह राज्यातील २९ महापलिकांच्या मतदानानंतर शुक्रवारी निकाल जाहीर झाले. भाजप हा पुन्हा एकदा सर्वात मोठा पक्ष ठरला असून महायुतीत असूनही शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार गटाला फारसा फायदा झाला नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
सोमवार, दि.१९ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# सदाचारासाठी गुरूंचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे – जितेंद्रनाथ महाराज

प्रतिनिधी १९ जानेवारी

**♦ पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये महापारायण सोहळ्याची सांगता व पुस्तक प्रकाशन**




**अमरावती:** मनुष्य जन्म एकदाच मिळतो आणि तो सत्कार्यासाठी उपयोगात यावा. मात्र योग्य दिशा व संस्कार न मिळाल्यास जीवन भरकटते. जीवनाला योग्य वळण देण्यासाठी गुरूंचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे असून, त्यांच्या मार्गदर्शनातून जीवनात आमूलाग्र बदल घडू शकतो, असे प्रतिपादन श्री देवनाथ पीठाधीश्वर परमपूज्य आचार्य श्री जितेंद्रनाथ महाराज यांनी केले. पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथे आयोजित श्री. संत गजानन महाराज महापारायण सोहळ्याच्या समारोपीय (सांगता) समारंभात ते बोलत होते. यावेळी त्यांनी अध्यात्म, सदाचार, संस्कार व जीवनातील योग्य मार्ग यांचे महत्त्व उपस्थित भाविकांना समजावून सांगितले.

या प्रसंगी महाराजांच्या शुभहस्ते संस्थेचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री प्रविण पोटे पाटील, अनुराधाताई पोटे पाटील, श्रेयशदादा पोटे पाटील, ॲड. प्रविण मोहोड, मुखोद्गत वाचक विद्याताई पडवळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप द्वारा प्रकाशित, श्री गजानन विजय ग्रंथातील संदर्भावर आधारित संत श्री गजानन महाराजांच्या जीवनकथेवरील 'श्री गजानन कथानक' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले या पुस्तकाचे लेखन तारा प्रद्युम्न देशपांडे व डॉ. सौ. गौरी योगेश बनसोड यांनी केले आहे. संपादनाची जबाबदारी विवेक कवठेकर यांनी पार पाडली असून, कथाचित्रण प्रा. अजय रायबोले यांनी केले आहे. मुखपृष्ठाची आकर्षक रचना प्रा. भूपेंद्र जयस्वाल यांनी केली आहे. शनिवार, १७ जानेवारी २०२६ रोजी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथे पार पडलेल्या या महापारायण सोहळा व पुस्तक प्रकाशन कार्यक्रमास शैक्षणिक, सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर भक्तिमय व आध्यात्मिक वातावरणाने भारावून गेला होता.

# हळदी–कुंकवाच्या कार्यक्रमातून परतताना दोन चोरीच्या घटना; अमरावतीत चेन स्नॅचिंगची दहशत

प्रतिनिधी १९ जानेवारी

**अमरावती :** शहरात मकर संक्रांतीनिमित्त सुरू असलेल्या हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमांनंतर महिलांना लक्ष्य करत चोरट्यांनी चेन स्नॅचिंगच्या दोन घटना घडविल्याने खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे या दोन्ही घटना अवघ्या अर्ध्या तासाच्या अंतराने घडून आल्या असून, एकूण १ लाख ६० हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे. या प्रकरणी बडनेरा व राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली घटना बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विजयपथनगर, एसओएस शाळेजवळ रविवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली. सुमारे ५७ वर्षीय महिला घराजवळून जात असताना दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे ४ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन हिसकावण्याचा प्रयत्न केला. महिलेने प्रतिकार केल्यामुळे चेनचे पेंडंट खाली पडले, मात्र चोरट्यांनी उर्वरित चेन घेऊन पळ काढला. या चेनची अंदाजे किंमत २० हजार रुपये आहे.

दुसरी घटना राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दत्तविहार कॉलनी परिसरात सायंकाळी सातच्या सुमारास घडली. ३८ वर्षीय महिला आपल्या मैत्रिणीसोबत हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमाला जात असताना काळ्या रंगाच्या दुचाकीवर आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील २२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र तसेच ६ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन हिसकावली. या घटनेत एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज लुटण्यात आला.

महिलेने आरडाओरड करत चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र चोरटे पसार झाले.

या दोन्ही घटना सुमारे अर्ध्या तासाच्या अंतराने घडल्या असून, चोरट्यांची कार्यपद्धती समान असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

बडनेरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सोने व राजापेठ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे या प्रकरणांचा अधिक तपास करीत आहेत. या घटनांमुळे शहरातील महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, शहरात चेन स्नॅचिंगच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने पोलीस विभागाने महिलांना विशेष सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हळदी-कुंकव तसेच इतर सार्वजनिक कार्यक्रमांना जाताना किंवा तेथून परतताना मौल्यवान सोन्याचे दागिने परिधान करणे टाळावे. शक्य असल्यास दागिने सुरक्षित ठिकाणी ठेवावेत, एकट्याने निर्जन रस्त्यांवरून प्रवास टाळावा आणि संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# तोंगलाबाद येथे २९ जानेवारीला सिनेतारकांची मांदियाळी

**♦ माजी विद्यार्थी मेळाव्यात 'सांज आठवांची' बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम**

प्रतिनिधी १९ जानेवारी



**दर्यापूर :** तालुक्यातील तोंगलाबाद येथील राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे माजी विद्यार्थी संघाच्यावतीने २९ व ३० जानेवारी रोजी भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सन १९६८ मध्ये या शाळेची स्थापना झाली असून आजपर्यंत येथे शिक्षण घेतलेल्या पाच हजार विद्यार्थ्यांचा हा भव्यदिव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्याच्या पहिल्या दिवशी, २९ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता, गीत, संगीत, नृत्य, विनोद, काव्य व निवेदन यांची सांगड घालणारा 'सांज आठवांची' हा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहे. या कार्यक्रमात मराठी चित्रपट व रंगभूमीवरील सुप्रसिद्ध हास्य कलाकार भारत गणेशपुरे, गौरव मोरे, तसेच अभिनेत्री हेमांगी कवी आणि अंकुर वाढवे यांच्या अदाकारीचा आस्वाद प्रेक्षकांना घेता येणार आहे. या माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी शाळेचे सुमारे पाच हजार माजी विद्यार्थी उपस्थित राहणार असून कार्यक्रमाबाबत परिसरात उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ नागरिकांनी व माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजक माजी विद्यार्थी संघ व आयोजन समिती, राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, तोंगलाबाद यांनी केले आहे.

# अंजनगाव सुर्जीत राजकीय भूकंप : युवासेना शहरप्रमुख पदाचा राजीनामा, आर्थिक व्यवहाराचे आरोप

**स्वीकृत नगरसेवक निवडीत गैरव्यवहाराचा आरोप; शिवसेना (उबाठा) अंतर्गत नाराजी उफाळली**

प्रतिनिधी १९ जानेवारी

**अंजनगाव सुर्जी :** नगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवक निवडीत आर्थिक व्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करत शिवसेना (उबाठा) युवासेना शहर अध्यक्ष अक्षय गवळी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. मंगळवार, १८ जानेवारी रोजी स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा केली. नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्यानंतर अवघ्या २५ दिवसांत अंजनगाव सुर्जीत उपाध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांची निवड प्रक्रिया पार पडली. विशेष म्हणजे, शिवसेना (उबाठा) कडे पुरेसे संख्याबळ असतानाही स्वीकृत नगरसेवक पदासाठी पक्षाचा अधिकृत उमेदवार न देता भाजपाला पाठिंबा देण्यात आला होता. या निर्णयानंतर आता स्वीकृत नगरसेवक निवडीतून नव्या वादाला तोंड फुटले आहे.



अक्षय गवळी यांच्या म्हणण्यानुसार, स्वीकृत नगरसेवक पदासा'ी त्यांनी स्वतः, राजेंद्र टांक, राजेंद्र पाटील आणि पंकज मोदी यांनी अर्ज दाखल केले होते. पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी शब्द दिल्याने निवड निश्चित असल्याचा विश्वास निर्माण झाला होता. मात्र, ऐनवेळी नव्या नावाचा प्रस्ताव पुढे येत पंकज मोदी यांची निवड झाल्याचा आरोप गवळी यांनी केला आहे. या घडामोडींमुळे पक्षातील प्रामाणिक कार्यकर्त्यांची किंमत शून्य झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली असून, या संपूर्ण प्रक्रियेत आर्थिक व्यवहार झाल्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

या प्रकारानंतर शिवसेना (उबा'ा) मध्ये मोठी गळती लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पक्षांतर्गत नाराजी उघडपणे समोर आल्याने येत्या काळात याचे गंभीर राजकीय परिणाम भोगावे लागू शकतात, असे राजकीय जाणकारांचे मत आहे. अंजनगाव सुर्जीच्या स्थानिक राजकारणात नव्या वादळाची नांदी या घटनेतून मिळाल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान, या आरोपांवर युवासेना व शिवसेना (उबाठा) चे जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, अक्षय गवळी यांना सलग चार वेळा युवासेना शहर अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली असून नगरपरिषद निवडणुकीत नगरसेवक पदासाठी उमेदवारीही देण्यात आली होती. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाल्याचे म्हणता येणार नाही. राजीनामा देण्यापूर्वी त्यांनी वरिष्ठांशी चर्चा करणे आवश्यक होते. आर्थिक व्यवहाराबाबत करण्यात आलेले आरोप पूर्णतः निराधार असून, आमच्या पक्षात अशा प्रकारचा कोणताही प्रकार होत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे अंजनगाव सुर्जीतील राजकीय वातावरण तापले असून, पुढील काळात या प्रकरणाचे पडसाद स्थानिक राजकारणावर उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# अमरावती महापौर पदावर आमदार राणांचा डोळा

संदीप मानकर १९ जानेवारी

**♦ अडीच वर्ष महापौर पदासाठी फिल्डिंग**



**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेची हाय व्होल्टेज निवडणूक पार पडली. कुठल्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसले तरी भाजपा हा मोठा पक्ष ठरला असून त्यांना २५ जागा मिळाले आहे. परंतु या निवडणुकीमध्ये खरे किंगमेकर ठरले ते आमदार रवी राणा त्यांनी अपेक्षित १५ जागांवर युवा स्वाभिमांच्या नगरसेवक निवडून आणून सर्वांनाच धक्का दिला आहे.

मात्र या निवडणुकीमध्ये त्यांनी जरी जाहीर केले असले की भाजपचा महापौर होईल? तरीही आमदार रवी राणा यांचाही महापौर पदावर डोळा असल्याचे चर्चा राजकीय जाणकारामध्ये आतल्या गोटातून सुरू झाली आहे.

मात्र हे महापौर पद कायमस्वरूपी असेल अडीच वर्षासाठी याकडे राजकीय जाणकारांचे लक्ष लागले आहे.

भारतीय जनता पार्टीने २५ जागा निवडून आणत असताना त्यामध्ये १५ जागांवर भाजपचे नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा यांच्या विचाराचे नगरसेवक निवडून आले आहे. त्यामुळे राणा दाम्पत्यांकडे ३० नगरसेवकांची संख्या झाली आहे.

त्यामुळे माजी खासदार नवनीत राणा व आमदार रवी राणा यांनी दिलेलाच महापौर असेल? अशी चर्चा ही राजकीय गोटात सुरू झाली आहे.

मात्र माजी खासदार नवनीत राणा यांनी भाजपच्या विरोधात काम करून इतर पक्षाला मदत केल्याची तक्रार भाजपच्या काही पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केल्यानंतर अमरावती राजकीय भूकंप झाला होता. मात्र रणादांपत्यांनी आपल्या सोयीनुसार नगरसेवकांना व पदाधिकाऱ्यांना मॅनेज करून आम्ही तक्रारीवर स्वाक्षरीस केली नसल्याचे व्हिडिओ त्यांनी सोशल मीडियावर व्हायरल केल्याने राणांना पुन्हा सहानुभूती मिळाली आहे.

एकीकडे राणा असतील तर आमदार खोडके दांपत्य भारतीय जनता पार्टी सोबत युती करायला तयार नाहीत. राणांसोबत बसल्यापेक्षा आम्ही विरोधात राहू असे आमदार संजय खोडके यांनी जाहीरच करून टाकले आहे. त्यामुळे आता भाजपाला आमदार रणांचीच साथ घ्यावी लागणार आहे.

मात्र भाजपच्या एका गटातून आमदार रवी राणा यांना खुला विरोध आहे. भाजपचा महापौर बसवताना आमदार रवी राणा यांची आम्हाला गरजच नसल्याचे त्यांनी जाहीर करून टाकले. त्यामुळे अमरावतीत राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. लवकरच महापौर पदाचे रोस्टर जाहीर होईल. त्यानंतर अमरावतीचा महापौर कोण होईल? हे स्पष्ट होईल.

मात्र महापौर पदाची रोस्टर निघण्यापूर्वीच अनेकांनी महापौर पदासाठी मोर्चा बांधणी सुरू केली आहे. आमदार रवी राणा हे राजकारणातली चाणक्य मानल्या जातात. त्यांनी पूर्वी जाहीर करून टाकले की महापौर भारतीय जनता पार्टीचा होईल. मात्र राजकारणात काहीही होऊ शकते. त्यामुळे युवा स्वाभिमान पक्षातूनही महापौर पदाच्या वाटाघाटी करता वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू असल्याचे बोलल्या जात आहे. लवकरच या घडामोडी साठी काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचाही दौरा अमरावतीत होऊ शकते. त्यामुळे राजकारणात काहीही शक्य असले तरी काँग्रेसच्या वतीने ही मोर्चा बांधणी करून सर्वांना एकत्र येऊन मोट बांधणे सुरू केले आहे.

त्यामुळे भारतीय जनता पार्टी सुद्धा गाफिल नसून राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पक्षाचे निरीक्षक डॉक्टर संजय कुटे अमरावतीच्या प्रत्येक बारीक हालचालीवर नजर ठेवून आहेत. त्यामुळे अमरावतीचा महापौर कोण? याची उत्सुकता मतदारांना लागली आहे.


**महापौर पदासाठी काँग्रेसची फिल्डिंग**

दुसरीकडे काँग्रेस पक्षाला १५ नगरसेवक निवडून आले आहे, एम आय एम चे १२ नगरसेवक, बहुजन समाज पार्टीचे तीन नगरसेवक, उद्धव बाळासाहेब ठाकरे चे दोन नगरसेवक, व वंचित आघाडीचे एक नगरसेवक, घेऊन सत्ता स्थापनेसाठी प्रयत्न केल्या जाणार आहेत. तसेच आमदार संजय खोडके व आमदार सुलभा खोडके यांचा राणांना विरोध असल्यामुळे ते भारतीय जनता पार्टी सोबत न राहता त्यांनी काँग्रेसला साथ दिल्यास काँग्रेसचाही महापौर अमरावतीत बसू शकते. याकरता माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर व खासदार बळवंत वानखडे यांनी मोर्चा बांधणी सुरू केली असून ते फील्डिंग लावून आहेत.

# हिरुर पुर्णा येथे रथसप्तमी महोत्सवानिमित्त माँ.नर्मदा महापुराण

**♦ १९ ते २५ जानेवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन**

प्रतिनिधी १९ जानेवारी



**अमरावती :** श्री. लखानंद दादाजी धुनीवाले संस्थान हिरुर पुर्णा आणि समस्त ग्रामवासी यांच्यातर्फे रथसप्तमी महोत्सवानिमित्त माँ. नर्मदा महापुराण आणि विविध धार्मिक कार्यक्रमाचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे.

चांदूरबाजार तालुक्यातील हिरुर पुर्णा येथे १९ जानेवारी ते २५ जानेवारीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये दररोज भक्तीमय कार्यक्रमाचे आयोजन भाविक भक्तांसाठी होणार आहे. सोमवारी १९ जानेवारी रोजी सकाळी दादाजी आरती व अकरा वाजता कलश यात्रेचे आयोजन गावातून करण्यात आले आहे.दुपारी एक वाजता माँ. नर्मदा महापुराण कथा प्रारंभ होईल. त्यानंतर रात्री नऊ वाजता भक्ति संगीत कार्यक्रम होणार आहे. मंगळवार २० जानेवारी रोजी रात्री नऊ वाजता सुंदर कांड, त्यानंतर २१ जानेवारी रोजी संत तुकडोजी महाराजांचे भजन, गुरुवार २२ जानेवारी रोजी रात्री दादाजी भजन, २३ जानेवारी रोजी अवधूत महाराज भजन मंडळातर्फे भजनाचा कार्यक्रम आणि शनिवार २४ जानेवारी रोजी भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. रविवार २५ जानेवारी रोजी माँ. नर्मदा महापुराण कथेचा समारोप होईल आणि त्यानंतर शुक्रवारी साडेबारा वाजता भव्य महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# गोरक्षण संस्थेस साहित्यिक बळी यांची भेट

प्रतिनिधी १९ जानेवारी

**♦ कृषी व गो - सेवेचे वैभव प्रदर्शित करणारी संस्था**



**दर्यापूर :** भारत या कृषी प्रदान देशातील कृषी व गो -सेवा या पुरातन संस्कृतिला उजाळा देणारे यशस्वी उपक्रम सातत्याने राबविणारी दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे ) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्था अभिनंदनास प्राप्त आहे असे गौरवपूर्ण उद्गार महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यीक तथा कलावंत किशोर बळी यांनी काढले . दर्यापूर येथे कार्यक्रमा निमित्य आलेल्या बळी यांनी गोरक्षण संस्थेस आवर्जून भेट देऊन गोरक्षण संस्थेच्या दिनचर्येची पाहणी करून माहिती जाणून घेतली तसेच या स्थळावर संस्थेचे संस्थापक - संचालक प्रा गजानन भारसाकळे यांचे द्वारे संशोधित गाईच्या शेणाची गोवरी व विविध प्रकारची शेती पूरक खत निर्मिती याबाबत विस्तृत चर्चाही केली . किशोर बळी यांनी आपले जूने मित्र प्रा गजानन भारसाकळे यांना त्यांच्या द्वारे प्रकाशीत 'कानी येता व्याकुळ हाका' या कविता संग्रह पुस्तकाची भेट देऊन त्यांच्या पवित्र गोसेवेचा आदर केला . गोरक्षण संस्थेच्या वतीने बळी यांना या स्थळावर उत्पन्न होणारा शेणखतावरील भाजीपाला सस्नेह देऊन संस्था भेटी बद्दल आभार व्यक्त करण्यात आले . प्रा गजानन भारसाकळे यांच्या संकल्पनेतून दर्यापूर येथे साकारल्या गेलेल्या आईमहोत्सव या बहुचर्चित कार्यक्रमात किशोर बळी यांच्या सलग चारवर्षे सादरीकरणास दर्यापूरकरांची अलोट गर्दी उपस्थिती उल्लेखनिय असल्याने या वर्षी सुद्धा पाचव्या आईमहोत्सव कार्यक्रम आयोजनावार प्रा. भारसाकळे व किशोर बळी यांच्यात सविस्तर चर्चा झाल्याचे समजते .

# जिल्हाधिकारी कार्यालयात 'वॉर रूम' कार्यान्वित; अधिकाऱ्यांशी थेट संवादाला सुरुवात

**अमरावती :** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या धर्तीवर आता जिल्हा परिषदेतही 'वॉर रूम' उभारण्यात आली आहे. या वॉर रूमच्या माध्यमातून जिल्हा परिषद मुख्यालयातील सर्व प्रमुख अधिकारी तसेच पंचायत समिती स्तरावर कार्यरत बीडीओ यांना एकाचवेळी जोडण्यात आले असून, त्यांच्याशी थेट संवाद साधण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. एखाद्या महत्त्वाच्या विषयावर तातडीने चर्चा करून निर्णय घेण्याची वेळ आली किंवा एखादी सूचना एकाचवेळी सर्वांपर्यंत पोहोचवायची असल्यास, यापूर्वी फोन कॉल किंवा मेलचा आधार घ्यावा लागत होता. मात्र आता वॉर रूम कार्यान्वित झाल्याने अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधणे शक्य झाले असून, हवी ती उपाययोजना त्वरेने अंमलात आणणे सुलभ झाले आहे. सीईओ यांच्यासह जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विविध विभागांचे डेप्युटी सीईओ या वॉर रूमचा नियमित वापर करीत असून, त्यामुळे प्रशासन अधिक दक्ष आणि लोकांप्रती अधिक उत्तरदायी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

# दुचाकी अपघातात तीन युवक गंभीर

प्रतिनिधी १९ जानेवारी

**खामगाव :** मुक्ताईनगर तालुक्यात राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या दुचाकी अपघातात खामगाव तालुक्यातील पिंप्री गवळी येथील तीन युवक गंभीररित्या जखमी झाल्याची घटना सकाळी घडली. मिळालेल्या माहितीनुसार, पिंप्री गवळी येथील तीन युवक दुचाकी (क्र. एम. एच. ५६-१४०६) ने इच्छादेवी येथे दर्शनासाठी जात होते. दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावर चालकाचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने भरधाव दुचाकी दुभाजकावर आदळली.या भीषण अपघातात दुचाकीवरील मंगेश नरहरी बुंधे (अंदाजे १९), अजय विष्णू बंड (अंदाजे २०) व धीरज वामन इंगळे(अंदाजे १९)हे तिघे गंभीर जखमी झाले.जखमी युवकांना तातडीने उपचारासाठी प्रथम मलकापूर व त्यानंतर खामगाव येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## खामगाव

# मोफत डायग्नोस्टिक व सर्जिकल कॅम्पला रूग्णांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

प्रतिनिधी १९ जानेवारी

**खामगाव :** येथील ठाकरे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर येथे मोफत डायग्नोस्टिक व सर्जिकल कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पला रूग्णांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. ठाकरे हॉस्पिटल व सरलाई किडनी सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल अकोला तर्फे आयोजित कॅम्प मध्ये युरोसर्जन डॉ. आशिष राऊत, ठाकरे हॉस्पिटलचे संचालक डॉ.निखिल ठाकरे यांच्यासह वैद्यकीय चमु उपस्थित होते. यावेळी डॉ.आशिष राऊत यांनी किडनी रोग, मुतखडा, प्रोस्टेट, मूत्ररोग निदान व आदी आजार विषयी रूग्णांची तपासणी करून त्यांना सल्लाविषयक मार्गदर्शन केले. दरम्यान यूरोफ्लोमेट्री व पीएसए तपासणी मोफत करण्यात आली. या सुविधेमुळे खामगाव व परिसरातील रुग्णांना मोठी सुविधा उपलब्ध झाली. मूत्रखडा, प्रोस्टेट ग्रंथीचे आजार, लघवीच्या तक्रारी आणि पुरुषांच्या लैंगिक समस्या यांवर स्थानिक पातळीवरच तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## ७८ वर्षांची परंपरा लाभलेला श्री गोरखनाथ बीज कार्यक्रम अकोल्यात साजरा होणार

प्रतिनिधी १९ जानेवारी



**अकोला :** इंगोले कुटुंबीय ७८ वर्षांपासून अखंडपणे श्री गोरखनाथ बीज कार्यक्रम साजरा करतात.

प्रारंभी हा कार्यक्रम इंगोले कुटुंबीयांचे मूळ गाव देऊळी येथे दरवर्षी आयोजित केला जात होता. मात्र, गेल्या ३ ते ४ वर्षांपासून हा धार्मिक कार्यक्रम डॉ. पराग इंगोले, प्रवीण इंगोले व घनशामजी इंगोले यांच्या निवासस्थानी, केशवनगर, अकोला येथे आयोजित करण्यात येत आहे. यंदाचा श्री गोरखनाथ बीज कार्यक्रम मंगळवार, २० जानेवारी रोजी होणार आहे.

## डवले कॉलेजच्या आदित्य शेळकेला रायफल शूटिंग मध्ये सुवर्णपदक



प्रतिनिधी १९ जानेवारी

**अकोला:** स्थानिय डवले कॉलेजचा वर्ग बारावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी आदित्य अनंत शेळके भोपाळ येथे संपन्न झालेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय रायफल शूटिंग स्पर्धेत संपूर्ण भारतातून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक प्राप्त केले. त्याचबरोबर टीम महाराष्ट्र कडून सहभाग घेत रजत पदक देखील मिळवून त्याने आपल्या गुणवत्ता व कर्तृत्वाची ठसठशीत छाप पाडली आहे.त्याची ही कामगिरी अत्यंत अभिमानास्पद असून त्याची मेहनत, चिकाटी, शिस्तबद्ध सराव आणि आत्मविश्वासाचे हे फलित आहे. त्याच्या या यशामागे प्रशिक्षक विन्सेंट अमेर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.डवले कॉलेजचे अध्यक्ष प्रकाश डवले तसेच संस्थेच्या संचालिका सौ मृणालिनी डवले यांनी त्याचे अभिनंदन करीत त्याचे यश हे डवले कॉलेजसाठी अत्यंत अभिमाना ची गोष्ट असल्याचे सांगितले.

# वर्तमान काळात पर्यावरण रक्षणाची अधिक गरज- प्रा. डॉ. प्रतिमा इंगोले

प्रतिनिधी १९ जानेवारी

## ◆ वनराई बालकुमार साहित्य संमेलनात पर्यावरणाचा जागर



**अकोला:** आजच्या धकाधकीच्या काळात कोणालाच वेळ नाही. माणसांची यंत्र झाली आहेत. पैशाला महत्व प्राप्त झाले आहे पण वर्तमान युगात पर्यावरण रक्षणाची अधिक गरज असल्याचे प्रतिपादन दुसऱ्या राज्यस्तरीय वनराई बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष प्रा. डॉ. प्रतिमा इंगोले यांनी केले.

पद्मविभूषण डॉक्टर मोहन धारिया जन्मशताब्दी निमित्त श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात त्या बोलत होत्या. संमेलनाचे उद्घाटक शेतकरी नेते प्रकाश पोहरे, स्वागतध्यक्ष प्रा. माया डिवरे ,वनराईचे सचिव अमित वाडेकर पूणे, वैज्ञानिक डॉ. अजित वर्तक ,अमरावती वनराईचे मधू घारड, डॉ. विजय निलावार हिंगोली,विलास देशपांडे परभणी, प्रशांत देशमुख, विजय कौसल, प्रशांत गावंडे ,विजय ठोकळ ,प्रा. प्रवीण ढोणे, श्रीकृष्ण विखे पाटील, डॉ. विवेक हिवरे, संमेलन संयोजक बबनराव कानकिरड विचारपीठावर उपस्थित होते.

पी एमश्री जिल्हा परिषद विद्यालय कामरगाव, गुरुकुंज कॉन्व्हेंट बोथाकाजी,श्री गुरुदेव किर्तन विद्यालय मलकापूर, महात्मा गांधी विद्यालय गांधीग्राम व महात्मा फुले विद्यालय आगर च्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात झाली .

मोहन धारिया व माधव गाडगीळ यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले. कवी रामराव पाटेखेडे यांनी संमेलन गीत व वनराई गीत सादर केले. बबनराव यांनी प्रास्ताविक केले. स्वागताध्यक्ष प्रा. माय डिवरे यांनी सर्वांचे स्वागत केले.

प्रकाश पोहरे यांनी मोहन धारिया यांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या विचारांचा वारसा जोपासण्यासाठी असे संमेलन गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. अमित वाडेकर म्हणाले, वनराई बालकुमार साहित्य संमेलनामुळे मोहन धारिया व माधव गाडगीळ यांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे . डॉक्टर मोहन धारिया यांनी राजकारणापेक्षा सामान्य जनतेच्या प्रश्नांना व देशासमोरील पर्यावरण समस्या सोडवण्याला अग्रक्रम दिला. त्यांचे कार्य पुढील पिढीला, कार्यकर्त्यांना सतत प्रेरणा देत राहील. विशेषता बालकुमारांना पर्यावरण जाणीव जागृतीसाठी वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिगत करण्यासाठी हे संमेलन यशस्वी ठरले असे प्रतिपादन वनराईचे सचिव अमित वाडेकर यांनी केले. बबनराव कानकिरड यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाचे संचालन स्वाती पाटेकडे यांनी केले. आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर मांडेकर यांनी केले.

दुपारच्या सत्रात कवी भाऊ फोकमारे यांच्या काव्यसंग्रहाच प्रकाशन कवी सुरेश पाचकवडे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. गणेशराव वसू,रघुनाथराव अंधारे, मंगेश पाटील फोकमारे,रावसाहेब काळे,अमोल गोंडचवर,तुळशीदास खिरोडकर,प्रमोद देहनकर, प्राध्यापक प्रवीण वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

## एकलव्य इंग्रजी निवासी शाळेत प्रवेशासाठी अर्ज करावा

**अकोला:** आदिवासी विकास विभागाच्या इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य निवासी शाळेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशासाठी परीक्षा दि. १ मार्च २०२६ रोजी होणार आहे. अकोला, बुलडाणा व वाशिम या जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, तसेच जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा, तसेच सर्व शासनमान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये ५ वी, ६ वी, ७ वी, व ८ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीचे विद्यार्थी सदर स्पर्धा परिक्षेसाठी पात्र राहतील. या सर्व शाळांतील मुख्याध्यापकांनी प्रवेश परीक्षेचे आवेदन पत्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला या कार्यालयाकडे सादर करावे.

## प्रा. शंकेश झायटे व निकिता अवजारे (झायटे) यांना आचार्य पदवी प्रदान

**अकोला :** स्थानिक श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय अकोला येथील रसायनशास्त्र विभागासाठी अभिमानास्पद ठरणारी शैक्षणिक कामगिरी नोंदवली गेली आहे. महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक प्रा. शंकेश झायटे व निकिता अवजारे (झायटे) यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामार्फत आचार्य (Ph.D.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये ही पदवी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली.

## रोटरी क्लब ऑफ अकोटतर्फे ‘युथ मंथ’ उत्साहात साजरा

वि. प्रतिनिधी १९ जानेवारी



**अकोट:** शहरातील लाल बहादुर शास्त्री ज्ञानपीठ व ज्युनिअर महाविद्यालयात विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ अकोटच्या वतीने ‘युथ मंथ’ साजरा करण्यात आला. ज्ञानसागर स्नेह संमेलनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमात रांगोळी, चित्रकला, निबंध, एकल स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाला विवेकवर्धिनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नानासाहेब हिंगणकर, सचिव भरत पेठे, व्यवस्थापक रमेश टावरी, माजी अध्यक्ष सुरेशदादा खोटरे, कोषाध्यक्ष कुंजीलाल कोठारी, रोटरी क्लब ऑफ अकोटचे अध्यक्ष इंजि. रवि पवार आदी मान्यवर उपस्थित होते. विविध स्पर्धांतील विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिसे व सन्मानचिन्हे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

या युथ मंथ प्रकल्पाचे प्रमुख श्यामकुमार शर्मा होते. यावेळी रोटरी क्लब ऑफ अकोटचे सचिव डॉ. नवेश मोहता, राजकुमार गांधी, संतोष इस्तापे, शिरीष पोटे, इंजि. प्रमोद लहाने, उद्धवराव गणगणे, दीपक कतोरे यांच्यासह क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विशाल सर, सपना मॅडम व प्राजक्ता मॅडम यांनी केले, तर साउंड व्यवस्थेची जबाबदारी आकाश गोरले, रवि टिकार व हरिओम भगत यांनी सांभाळली.

## पुण्यस्मरण सोहळ्यात हभप शिवलीलाताई पाटील यांचे कीर्तन

प्रतिनिधी१९ जानेवारी




**अकोट:** अकोट तालुक्यातील ग्राम येदलापूर येथील सामाजिक कार्यकर्ते रामप्रभू तराळे यांच्या मातोश्री स्व. सुधाताई गजाननराव तराळे यांचा ३५ पस्तीसाव्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त येदलापूर येथे राहत्या घरी विविध सांप्रदायिक कार्यक्रमाचे आयोजन केले असून त्याच बरोबर पुण्यस्मरण सोहळा हा अनोख्या पद्धतीने गावालाच नव्हे तर संपूर्ण तालुक्याला जनजागृती सांप्रदायिक कार्यक्रमाच्या माध्यमातून वेगळा वागळा उपक्रम राबवत सामाजिक दृष्ट्या विख्यात असलेल्या युवा कीर्तनकार हभप शिवलीलाताई पाटील यांचे जाहीर भव्य कीर्तनाचा कार्यक्रम सोमवार दि.१९ ला वेळ दुपारी ४ ते ६ स्थळ श्री शेत्र श्रद्धासागर आकोट दर्यापूर रोडवर स्थित असून आयोजित केला आहे, किर्तन वेळेवर सुरू होईल तरी सर्व अकोट तालुक्यातील नागरिकांना या कीर्तन सोहळ्याचा अवश्य लाभ घेण्याकरता आवर्जून उपस्थिती लावावी असे आव्हान राम प्रभू तराळे सह डॉ. गणेश तराळे समस्त तराळे येदलापूर परिवार कडून होत आहे.

## मांजा धागा दुचाकी चालकाच्या हातास गुंडाळला

प्रतिनिधी १९ जानेवारी

### ◆ सुदैवाने अनुचित घटना टळली



**आलेगाव :** येथील वाहतूक रस्त्यावरून अनेक वाहने मार्गस्थ होत असताना,दुचाकी चालक गणेश चौथवे आपल्या बाईकने घरी जात असताना त्यांच्या गाडीवर पतंगाचा मांजा धाग्याने वेढा देत हाताच्या अंगठ्याला धागा गुंडाळण्याची घटना घडून जखमी होण्याचा प्रकार १८ रोजी घडला. या मध्ये सुदैवाने त्यांना मोठी इजा झाली नाही.

पतंग उडवताना काळजी घेत मांजा धागा न वापरता पतंग उडवण्याचा उत्साह साजरा करण्याचे जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांनी व्हिडिओ द्वारे मांजा धागा विक्री विक्रीला बंदी असून साधा धागा वापरून पतंग उत्सव साजरा करावा असे सुचविल्या नंतर ही अनेक ठिकाणी मांजा धागा वापरून पतंग उडवण्याचा उत्साह साजरा केला जात असल्याचा प्रकार पातूर तालुक्यातील आलेगावा मध्ये समोर आला आहे.येथील एक छोटा व्यावसायिक गणेश चौथवे हे आपल्या दुचाकीने अतिरहदारी असलेल्या छत्रपती शिवाजी चौक रस्त्यावरून घरी जात असताना अच्यानक त्यांच्या हाताला आणि गाडीला मांजा धाग्याने वेढा घातला असता त्यांनी हळू असलेल्या दुचाकीला जागेवर थांबवून हाताला व गाडीला गुंडाळलेला धागा अलगद काढला.सदर व्यक्तीची दुचाकी स्पीड मध्ये असती आणि धागा मानेला गुंडाळल्या गेला असता तर मोठी घटना घडली असती.परंतु त्यांच्या हाताच्या अंगठ्याला थोडी इजा झाल्याचे त्यांनी सांगितले.सदर उत्सव हा बरेच दिवस चालणार असल्यामुळे,पतंगोत्सव साधा धागा वापरून साजरा करण्या ऐवजी मांजा धागा वापरून उत्सव साजरा होताना या प्रकारावरून स्पष्ट दिसून येत आहे.मांजा धागा विक्रीला बंदी असताना सुद्धा आलेगावामध्ये मांजा धागा विक्रीला जोर आला आहे.मांजा धाग्यामुळे मोठी दुर्घटना होण्यापूर्वी पोलिस प्रशासनाने वेळीच लक्ष देण्याची गरज बनली आहे.

## निधन वार्ता

### रमेशराव गवई



**अकोला:** भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक, आंबेडकरी चळवळीचे निष्ठावान राहिलेले रमेशराव गवई गुरुजी यांचे निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. कौलखेड हिंगणा रोड भागातील निवासस्थानाहून अंत्ययात्रा निघाली. भारतीय बौद्ध महासभा, वंचित बहुजन आघाडी तसेच समाजातील गणमान्य अंत्यसंस्कार प्रसंगी उपस्थित होते.

## अतिक्रमित जमिनीच्या वादातून महिलेला मारहाण

### ◆ पोलिसांकडून कारवाईत टाळाटाळ, एसपींकडे धाव

प्रतिनिधी १९ जानेवारी

**अकोला:** अकोला जिल्ह्यातील डाबकी जहांगीर येथील एका महिलेला जमिनीच्या वादातून गावातील काही महिला व पुरुषांनी बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तक्रार देऊनही पोलीस कोणतीही कारवाई करत नसल्याचा आरोप करत पीडित महिलेने आता जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे न्यायाची मागणी केली आहे.

डाबकी जहांगीर येथील रहिवासी प्रतिमा मनोहर पळसपगार या गेल्या २० ते २५ वर्षांपासून त्यांच्या आईसोबत गावातील जिल्हा परिषद शाळेच्या मागील जमिनीवर राहत आहेत. त्यांनी ही जमीन आपल्या नावावर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्जही केला आहे. यापूर्वी जेव्हा ग्रामपंचायत प्रशासनाने त्यांचे घर पाडण्याचा प्रयत्न केला होता, तेव्हा त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. त्यावेळी न्यायालयाने ग्रामपंचायत आणि संबंधित अधिकाऱ्यांना अतिक्रमण न हटवण्याचे निर्देश दिले होते. असे असतानाही, या गरीब महिलेला जाणीवपूर्वक त्रास देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. महिला आपल्या जागेला कुंपण घालण्यासाठी मोजमाप करत असताना, गावातील ८ ते १० जणांनी त्यांना अडवून मारहाण केली. काही पुरुषांनी महिलेचे हात धरून त्यांना फरफटत मुख्य रस्त्यावर आणले. तसेच, कुंपण घातल्यास जीवे मारण्याची आणि घर जाळून टाकण्याची धमकीही दिली.

**पुराव्यासाठी मोबाईल काढला तर फोन फेकून दिला**

महिलेने आपल्यावर होणारा अन्याय मोबाईलमध्ये रेकॉर्ड करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींपैकी एका महिलेने त्यांचा फोन हिसकावून फेकून दिला. ठतुला जे करायचे आहे ते कर,ठ अशी धमकीही यावेळी देण्यात आली.

मारहाण करणाऱ्यांमध्ये निशा राठोड, अशोक राठोड, तेजल जाधव, गणेश तायडे, आकाश राठोड आणि इतर ३ ते ४ अनोळखी व्यक्तींचा समावेश आहे. याप्रकरणी महिलेने पिंजर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मात्र, तक्रार देऊनही पोलीस कारवाई करत नसल्याचा आरोप करत महिलेने जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे.

## लखन इंगळे यांचा २६ जानेवारीला आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १९ जानेवारी

### ◆ शहरातील अतिक्रमण जागेचे पट्टे बहाल करा



**अकोट:** अकोट शहर मध्ये बऱ्याच वर्षे पासुन अधुरे राहिलेले अतिक्रमण जागेचे पट्टे बहाल करून त्या जागी घरकुल द्या नाहीतर आंदोलन करू वंचित चे लखन इंगळे यांचा २६ जानेवारी ला अतिक्रमण लाभार्थी सह न.प.आकोट येथे आंदोलनाचा इशारा वंचित बहुजन चे लखन इंगळे यांनी सर्व जाती धर्माचे नागरिक राहतात अशा अतिक्रमण जागा नियमानुकूल करून त्या जागेचे पट्टे बहाल करून त्या जागी घरकुल चा लाभ देण्यासाठी इंगळे यांनी शासन निर्णय २०१८ नुसार निघाला त्या वर्षा पासुन तर लगातार आज परियंत विविध प्रकारे निवेदन अकोला जिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी आकोट नगर परिषद तत्कालीन मुख्यअधिकारी वाहूरवाघ साहेब यांना देऊन कार्यालयात आंदोलन करून मोर्चे काढून त्याचा पाठपुरावा केला याची दखल संबंधित अधीकारी यांनी घेतली व आकोट शहर मध्ये अतिक्रमण धारक यांच्या फाईल जमा करून काही वार्डात ड्रोन द्वारे अतिक्रमण जागेचे सर्वे करून त्या जागेचे सर्व नकाशे नजूल शीट तयार केले त्यामध्ये न.प.आकोट यांनी नेमलेल्या एजेंशीकडे रुपये ८६००० रुपयाची नजूल मोजणीचे चलान न न.प.आकोट यांनी भरल्यामुळे अधुरे राहिलेले काम हे अजुन बाकी असुन करीता अतिक्रमण जागेचे पट्टे बहाल करण्यात यावे यां संदर्भात दि. २६ जानेवारी रोजी अतिक्रमण लाभार्थी यांना सोबत घेऊन नगर परिषद कार्यालय येथे आंदोलन करू असे निवेदन आकोट नगर परिषद मुख्यअधिकारी मार्फत उपमुख्य अधिकारी व आकोट नगराअध्यक्ष मायाताई धुळे निवेदन देऊन अतिक्रमण बाबत चा ठराव घेऊन याबद्दल चर्चा केली निवेदन सादर केले निवेदन देते वेळी चेतन तेलगोटे, प्रतीक तेलगोटे, योगेश दवंडे, सुगत तेलगोटे, भारत वाघमारे, नवनीत तेलगोटे, सुगत तेलगोटे, सुरज तेलगोटे, अर्पण आठवले, श्याम दवंडे यांचे नावे साक्षर आहेत.

## सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये हळदीकुंकू समारंभ उत्साहात

प्रतिनिधी १९ जानेवारी




**अकोट :** अकोट तांदुळवाडी फाटा स्थित सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये दि.१७ रोजी हळदीकुंकू मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमा करिता संस्थेचे मान्यवर शारदा लखोटीया, रेखा चांडक, सुधा डागा ,अवनी लखोटिया,उप प्रा. कविता मिश्रा तसेच प्रमुख अतिथी मंजु टावरी,चंचल गुप्ता , सारिका पितांबरवाले, अस्मिता लखोटिया ,शिल्पा गायगोले , व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे कुमकुम तिलक करून सरस्वती व सुगडी पूजन करण्यात आले. यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व हळदीकुंकू लावून त्यांना वाण देण्यात आले .सर्वच मान्यवरांनी सुंदर आणि मजेदार असे उखाणे घेतले. त्यानंतर रूपाली कुटे यांनी अप्रतिम गीत सादर केले.यानंतर शाळेच्या शिक्षिकांनी मनमोहक नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली .यानंतर पुनम मोरखडे व कीरण ढगेकर यांनी कार्यक्रमांमध्ये मान्यवर,पालक व शिक्षकांसाठी विविध खेळांचे आयोजन केले होते . सर्व महिला मंडळी मोठ्या उत्साहाने खेळात सहभागी झाल्या. खेळताना महिला पालकवर्गाचा आनंद ओसंडून वाहत होता . विजयी स्पर्धकांना बक्षीस देण्यात आले. यानंतर वाण देण्यात आले. या शानदार कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन काजल पवार व अश्विनी हुलहुले यांनी केले .कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सांस्कृतिक वि. प्र. धनश्री कुलट तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## प्रभातच्या दोन विद्यार्थ्यांची ‘विद्यार्थी विज्ञान मंथन’ मध्ये राष्ट्रीय स्तरावर निवड



**अकोला :** देशातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी राबविण्यात येणारी विद्यार्थी विज्ञान मंथन या भारतातील सर्वात मोठ्या डिजिटल आधारित विज्ञान प्रतिभा शोध परीक्षेअंतर्गत ‘विद्यार्थी विज्ञान मंथन’ २०२५-२६ च्या राज्यस्तरीय शिबिर (स्तर-३) परीक्षेत प्रभात किड्स स्कूल, अकोला येथील इयत्ता दहावीतील आर्या राजू राठी आणि इयत्ता आठवीतील अनन्या संजय ठाकरे यांनी उज्वल यश संपादन करत दोन विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावून थेट राष्ट्रीय स्तरासाठी त्यांची निवड झाली आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. या अभूतपूर्व यशामुळे प्रभात किड्स स्कूल, अकोला तसेच संपूर्ण अकोला जिल्ह्याचा पुन्हा एकदा शैक्षणिक गौरव वाढला आहे. प्रभात किड्स स्कूलचे संस्थापक संचालक डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, प्राचार्य वृषाली वाघमारे यांच्यासह शिक्षकवर्गाने व पालकांनी विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमांचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे व पालकांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याचे मनःपूर्वक कौतुक केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616

बातम्यासाठी संपर्क 9075012801

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# सराईत चोरट्यास अटक

प्रतिनिधी १९ जानेवारी

**यवतमाळ** : यवतमाळ शहर व परिसरात चोरी, घरफोडी व दुचाकी चोरीचे गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ पथकाने अटक केली. त्याच्याकडून ५,८८,१०७ किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे यवतमाळ जिल्ह्यातील नऊ चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.



## नऊ गुन्हे उघड; सहा लाखाचा मुद्देमाल जप्त

अक्षय दयाराम मसराम (वय २८, रा. नेताजीनगर, यवतमाळ) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यवतमाळ उपविभागात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, अक्षय दयाराम मसराम (वय २८, रा. नेताजीनगर, यवतमाळ) हा सराईत गुन्हेगार यवतमाळ शहर व आजूबाजूच्या परिसरात घरफोडी, मोटारसायकल चोरी व जबरी चोरीचे गुन्हे करत असून सध्या वनविभाग उद्यानाजवळील जाम रोड परिसरात चोरीच्या उद्देशाने फिरत आहे. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जाम रोड परिसरात सापळा रचून आरोपीस ताब्यात घेतले. चौकशीत त्याच्याकडून विविध ठिकाणांहून चोरी केलेले सोन्याचे दागिने (२६.०५ ग्रॅम, किंमत २,६०,५००), चांदीचे दागिने (१५३.०४ ग्रॅम, किंमत ३०,६०८) तसेच सुझुकी ॲक्सेस दुचाकी (किंमत ९०,०००) असा एकूण ३,८१,१०८ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याशिवाय आरोपीने यवतमाळ शहर व पुसद तालुक्यातील चोरीतील ७ एलईडी टीव्ही (२,०३,९९९) व १ सिलेंडर (३,०००) आपल्या राहत्या घरी लपवून ठेवल्याची माहिती दिल्यानंतर तो मुद्देमालही हस्तगत करण्यात आला. अशा प्रकारे एकूण ५,८८,१०७ किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. पोलीस ठाण्याच्या अभिलेख तपासणीत आरोपीकडून पो.स्टे. अवधुतवाडी येथील ६, लोहारा येथील २ व वसंतनगर येथील १, असे एकूण ९ गुन्हे उघडकीस आले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंतासा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, व पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष गावंडे, पोलीस उपनिरीक्षक गजानन राजमलू यांच्यासह सफौ. साजिद, सफौ. योगेश गटलेवार, पो.हवा. प्रशांत हेडाऊ, रूपेश पाली, योगेश डगवार, सचिन घुगे, निलेश राठोड, पो.शि. सुनील पैठणे, आकाश सहारे, देवेंद्र होले, आकाश सूर्यवंशी (सर्व स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ) यांनी यशस्वीपणे पार पाडली.

# कोंबड बाजारावर धाड; सहा जण अटकेत

## सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १९ जानेवारी

**यवतमाळ** : कुंभारखनी क्वार्टर परिसरातील जंगलसदृश भागात सुरू असलेल्या कोंबडा जुगाराच्या अड्ड्यावर वणी पोलिसांनी रविवारी (दि. १८ जानेवारी) कारवाई करत सहा जणांना अटक केली. या कारवाईत पोलिसांनी १,०४,१५० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कैलास जगन पेंदोर (३०, रा. सुरला, ता. झरी-जामनी), धर्मा किसन परचाके (४३, रा. सुरला, ता. झरी-जामनी), उत्तम बोडकाजी ठाकरे (५५, रा. वेगाव, ता. मारेगाव), ऋषभ गजानन खुसपुरे (२८, रा. कोलगाव, ता. मारेगाव), शंकर शामराव वराटे (३२, रा. मारेगाव, ता. वणी, रमेश हिरामन झाडे (४०, रा. गणेशपूर, ता. वणी) यांना अटक करण्यात आली.

उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक गोपाल उंबरकर यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. पोलीस हवालदार निलकमल भोसले यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे कुंभारखनी क्वार्टरच्या मागील भागात कोंबड्यांच्या झुंजीवर पैशांची बाजी लावून जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक सुयोग महापुरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पंचांसह घटनास्थळी छापा टाकला. छाप्यादरम्यान कैलास जगन पेंदोर (३०, रा. सुरला, ता. झरी-जामनी), धर्मा किसन परचाके (४३, रा. सुरला,



ता. झरी-जामनी), उत्तम बोडकाजी ठाकरे (५५, रा. वेगाव, ता. मारेगाव), ऋषभ गजानन खुसपुरे (२८, रा. कोलगाव, ता. मारेगाव),

शंकर शामराव वराटे (३२, रा. मारेगाव, ता. वणी, रमेश हिरामन झाडे (४०, रा. गणेशपूर, ता. वणी) यांना रंगेहाथ अटक करण्यात आली. आरोपींकडून जुगारासाठी वापरलेली रोख रक्कम ४०,६००, झुंजीसाठी वापरलेले तीन कोंबडे (एक जखमी), चार मोबाईल फोन, बजाज सिटी १०० मोटारसायकल (MH-29 BJ-4850) तसेच कोंबड्यांच्या पायांना बांधलेल्या लोखंडी धारदार कात्या असा एकूण १,०४,१५० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त कोंबड्यांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पोलीस ठाण्यात लिलाव करण्यात आला असून त्यातून ८०० रक्कम प्राप्त झाली आहे. या प्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (ब) व १२ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अनुष्का पाटोळे प्रकरण: उद्या सामूहिक आक्रोश मोर्चा

प्रतिनिधी १९ जानेवारी

**यवतमाळ** : स्व. अनुष्का किरण पाटोळे यांच्यावर झालेल्या अन्यायाविरोधात यवतमाळातील विविध सामाजिक संघटनांनी भव्य 'सामूहिक आक्रोश मोर्चा' काढण्याचा निर्णय घेतला आहे. हा मोर्चा मंगळवार, २० जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता संविधान चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ सुरू होईल.

स्व. अनुष्काच्या मृत्यूपूर्वी केलेल्या "मला जगायचं आहे..." या आवाजाला शाळा प्रशासनाच्या दुर्लक्षित धोरणामुळे दबवले गेले, असे आयोजकांचे म्हणणे आहे. आज तोच दाबलेला आवाज न्यायासाठी आक्रोशाच्या स्वरूपात रस्त्यावर उतरवला जाणार आहे, असे प्राध्यापक संजय वानखडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, "न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही." मोर्चा सकल मातंग समाज, विदर्भ मातंग समाज संघटना, लहुजी शक्ती सेना, साहित्यरत्न कला सांस्कृतिक विकास फाउंडेशन, अण्णाभाऊ साठे स्मारक समिती, बँड असोसिएशन, लहु टायगर सेना, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशन (न्यू दिल्ली), समता पर्व प्रतिष्ठान, संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, शेतकरी चळवळ संघटना, यवतमाळ वकील संघटना, ग्राहक संरक्षण समिती यांसह जवळपास ३० हून अधिक संघटनांच्या पाठिंब्याखाली काढला जाणार आहे.

मोर्चाच्या माध्यमातून SIT चौकशी, फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवणे, दोषींवर कठोर कारवाई आणि पीडित कुटुंबाला तत्काळ न्याय देणे ही संघटनांची ठोस मागणी राहणार आहे. तसेच महाराष्ट्रातील वसतिगृहांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक सुविधा आणि सीसीटीव्हीची कमतरता दूर करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. आयोजकांनी सांगितले की, ही लढाई केवळ अनुष्कासाठी नाही, तर वसतिगृहांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलींच्या सुरक्षित भविष्यासाठी आहे, न्याय मिळेपर्यंत हा मोर्चा सुरू राहणार आहे.

# गांजा तस्करी : दोन आरोपींना अटक; एक आरोपी फरार

प्रतिनिधी १९ जानेवारी

**यवतमाळ** : दुचाकीवरून गांजाची तस्करी करणा-या दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली. सदर आरोपीकडुन १ लाख ३३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, एक आरोपी फरार झाला आहे. पुसद ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घोनसरा-मोहदी रोडवर सापळा लावून ही कारवाई केली.

अमरसिंग चतरु जाधव (वय ५६, रा. आमणी लहान, ता. महागांव), शंकर देवराव खोकले (वय ४१, रा. आमणी लहान, ता. महागांव) अशी आरोपींची नावे आहे. दिनांक १७ जानेवारी रोजी सायंकाळी ६.२० वाजता गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, घोनसरा गावाजवळून तिघे संशयित एफझेड मोटारसायकलवरून गांजा घेऊन येत आहेत. या माहितीची पडताळणी करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रात्री ९.१० वाजता घोनसरा गावापासून सुमारे १०० मीटर अंतरावर सापळा रचला. मोटारसायकल दिसताच पोलिसांनी कुशलतेने वाहन थांबवले. मात्र, एक आरोपी पळून गेला. उर्वरित दोघांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्याकडील पिवळ्या प्लास्टिक पिशवीतून १ किलो १७० ग्रॅम गांजा आढळला. यावेळी अमरसिंग जाधव, शंकर खोकले या दोघांविरुद्ध अंमली पदार्थ व मनोविकारजन्य द्रव्य कायदा



(एनडीपीएस) १९८५ च्या कलम ८(सी), २०(बी)(बी) अंतर्गत पुसद ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात (म.पो.से.), सहायक पोलीस अधीक्षक व उपविभागीय अधिकारी हर्षवर्धन बी.जे. (भा.पो.से.), पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक धीरज बांडे, उपनिरीक्षक शरद लोहकरे, शिपाई मुन्ना आडे, पोलीस हवालदार संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड तसेच चालक उपनिरीक्षक रविंद्र शिरामे व शिपाई राजेश जाधव यांनी केली.

# ब्राम्हणी फाट्यावर चाकूहल्ला; ५० हजारांच्या वादातून युवकाकडून जिवे मारण्याची धमकी

प्रतिनिधी १९ जानेवारी

**वणी** : वणी शहरालगत असलेल्या ब्राम्हणी फाटा परिसरात पैशांच्या वादातून चाकूने हल्ला केल्याची गंभीर घटना घडली असून या प्रकरणी वणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेत फिर्यादी जखमी झाला असून आरोपीविरुद्ध गंभीर कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणी राहुल केशवराव नागतुरे (वय ४०, रा. काजीपुरा वार्ड क्र. ११, वणी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास ब्राम्हणी फाटा येथील डोलीकर देशी दारू भट्टीसमोर ही घटना घडली.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपी यश मोरेश्वर डाखरे (वय २३, रा. जैन लेआऊट, वणी) याने अनोळखी इसमाकडून ५० हजार रुपये मागून दे अशी मागणी करत वाद घातला. या वादाचे रूपांतर शिवीगाळीत झाले. यावेळी आरोपीने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली. वाद अधिक चिघळल्यानंतर आरोपीने हातातील चाकूने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या बोटावर वार केला, ज्यात फिर्यादी जखमी झाला.

या घटनेनंतर फिर्यादीने दिलेल्या जबानी तक्रारीवरून वणी पोलीस ठाण्यात अप.क्र. ३०/२६ नुसार भा.न्या.सं. कलम ११८(१), ३५२, ३५१ (२)(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा १७ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२.३४ वाजता नोंदविण्यात आला.

या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. आरोपीला लवकरच ताब्यात घेऊन अधिक चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे.

# कौस्तुभ चव्हाण विदर्भ क्रिकेट संघात

प्रतिनिधी १९ जानेवारी

**आर्णी** : आर्णी तालुक्यातील यरमल (हेटी) येथील भुमीपुत्र कौस्तुभ नेमीचंद चव्हाण याची १४ वर्षाखालिल विदर्भ क्रिकेट संघात निवड झाली आहे. अमरावती विभागातून विदर्भ संघात निवडलेला हा एकमेव खेळाडू ठरला आहे.



कौस्तुभ सध्या अकोला येथील इग्लीश हायस्कुलमध्ये ८ वीत शिकत असून, त्याच्या या निवडीमुळे आर्णी तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेल्याचे मत क्रीडा रसिकांनी व्यक्त केले आहे. विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या ज्युनिअर निवड समितीने कौस्तुभ याला १५ ते ३० जानेवारी दरम्यान इंदूर येथे होणाऱ्या राजसिंग दुगरपूर ट्रॉफी (सेंट्रल झोन) साठी निवडले आहे. या स्पर्धेत विदर्भ संघासोबत उत्तर प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, उत्तराखंड, मध्य प्रदेश अशा संघांचा सहभाग राहणार आहे. कौस्तुभने यापूर्वी विदर्भ क्रिकेट असोसिएशन अंतर्गत झालेल्या १५ वर्षाखालिल भास्कर जोशी शालेय क्रीकेट स्पर्धेत अष्टपैलू कामगिरी करत अकोला जिल्हा क्रीकेट संघाचे नेतृत्व केले आहे. त्याच्या यशाबद्दल कौस्तुभ म्हणतो, "माझे कोच, आई व वडील यांच्याशिवाय हे शक्य झाले नसते. त्यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मला सदैव प्रेरणा देते." तालुक्यातील क्रीडा रसिकांनी कौस्तुभचे कौतुक केले.

# प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात शिवसैनिकाचा एल्गार

## २५ जानेवारीपासून महागाव पंचायत समितीसमोर आमरण उपोषण

प्रतिनिधी १९ जानेवारी

**महागाव** : करंजखेड येथील बौद्ध समाजाच्या सामाजिक जागेच्या संदर्भात शासकीय दप्तरात खोडतोड व फेरफार केल्याच्या तक्रारीवर महिना उलटूनही कारवाई न झाल्याने, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमरखेड विधानसभा प्रमुख भीमराव भालेराव यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या २४ जानेवारीपर्यंत दोषींवर कारवाई न झाल्यास, २५ जानेवारी २०२६ पासून महागाव पंचायत समिती कार्यालयासमोर 'आमरण उपोषण' करण्याचा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

### प्रशासनाविरोधात संघर्ष

■ प्रशासनाच्या उदासीन कारभाराचा निषेध करत भीमराव भालेराव यांनी थेट संघर्षाची भूमिका घेतली आहे. त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात स्पष्ट इशारा दिला आहे. संबंधित प्रकरणाचा २४ जानेवारीपर्यंत निकाल लागला नाही किंवा दोषींवर कारवाई झाली नाही, तर २५ जानेवारीपासून पंचायत समितीसमोर आमरण उपोषणास सुरुवात करण्यात येईल. या आंदोलनात ते आपल्या समर्थकांसह सहभागी होणार आहेत. प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र केले जाईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

महागाव तालुक्यातील मौजा करंजखेड येथील बौद्ध समाजाच्या सामाजिक उपयोगासाठी असलेल्या जागेच्या शासकीय दप्तरामध्ये तत्कालीन सचिव आणि सरपंच यांनी संगनमताने खोडतोड व फेरफार केल्याचा आरोप भीमराव भालेराव यांनी केला आहे. या गंभीर प्रकाराबाबत त्यांनी १ डिसेंबर २०२५ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती महागाव यांच्याकडे रितसर पुराव्यानिशी तक्रार दाखल केली होती.

तक्रार देऊन आज दीड महिना उलटला तरी प्रशासनाने यावर कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. "शासकीय दप्तरात फेरफार करणे हा अत्यंत गंभीर गुन्हा असतानाही प्रशासन गप्प का?" असा सवाल भालेराव यांनी उपस्थित केला आहे. तसेच, संबंधित दोषी व्यक्तींना वाचवण्याचा प्रयत्न तर होत नाही ना, अशी शंकाही त्यांनी आपल्या निवेदनात व्यक्त केली आहे.

प्रशासनाच्या या उदासीन कारभाराचा निषेध करण्यासाठी भीमराव भालेराव यांनी आता थेट संघर्षाची भूमिका घेतली आहे. त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात स्पष्ट म्हटले आहे की, २४ जानेवारीपर्यंत या प्रकरणाचा निकाल लागला नाही किंवा संबंधितांवर कारवाई झाली नाही, तर २५ जानेवारीपासून ते आपल्या समर्थकांसह पंचायत समितीसमोर आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात येणार आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (यवतमाळ) आणि पोलीस निरीक्षक (महागाव) यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. आता या इशाऱ्यानंतर प्रशासन खडबडून जागे होणार का? आणि दोषींवर कारवाई होणार का?, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

# यवतमाळमध्ये विधी सेवा महाशिबिर

प्रतिनिधी १९ जानेवारी

यवतमाळ - यवतमाळ जिल्ह्यात फेब्रुवारी महिन्यात विधी सेवा महाशिबिर आयोजित करण्याचे ठरले असून, हे शिबिर नेर तालुका आणि दारव्हा व बाभुळगाव या दोन तालुक्यांमध्ये घेण्यात येणार आहे. शिबिराच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना शासनाच्या विविध शासकीय व कल्याणकारी योजनांची माहिती दिली जाणार असून, पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष शेखर चु. मुनघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली न्याय सेवा सदन येथे आढावा बैठक पार पडली. बैठकीचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश-1 एस. यु. बघेले यांनी केले, तसेच सचिव, न्यायिक अधिकारी व विविध शासकीय विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत शिबिर यशस्वी करण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी, कार्यपद्धती व विविध विभागांच्या सहभागाबाबत सविस्तर चर्चा झाली. कृषी, समाजकल्याण, कामगार, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, आरोग्य, नगरपरिषद, परिवहन, पाणीपुरवठा, ऊर्जा, बँकिंग आणि सखी वन स्टॉप सेंटर आदी विभागांनी स्टॉल उभारून लाभार्थ्यांना माहिती व सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देश मिळाले.

नरेगा, घरकुल योजना, स्वच्छता गृह, कृषी व सामाजिक कल्याण योजनेसह विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले असून, शिबिरात स्वच्छता, पिण्याचे पाणी व बसण्याची सोय याची विशेष काळजी घेण्याचे निर्देशही दिले गेले आहेत.

# नो पार्किंग झोनमध्ये अवैध ट्रॅव्हल्स सेवा सुरुच!

## वाहतूक विभाग व आरटीओ विभागाची दुर्लक्ष

प्रतिनिधी १९ जानेवारी

**उमरखेड** : बस स्टॉप परिसरातील नो पार्किंग झोनमध्ये अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्समुळे वाहतूक कोंडी वाढली आहे. यासंबंधी अनेक नागरिकांनी तक्रारी केल्या असून, तरीही वाहतूक विभाग व प्रादेशिक परिवहन विभाग या मुद्द्यांकडे दुर्लक्ष करत आहेत.



महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार, एसटी बस स्टॉप परिसरातील 200 मीटर अंतरात नो पार्किंग झोन घोषित केले गेले असून, त्यात अवैध प्रवासी वाहतूक करणारे वाहन उभे राहू नयेत. परंतु, स्थानिक प्रशासनाचे यावर तात्काळ कारवाई न केल्यामुळे ही परिस्थिती जसाची तशी आहे. प्रहार जनशक्ती पक्ष ने या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन दिले होते.

त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी उप प्रादेशिक परिवहन यवतमाळ यांना कारवाई करण्याचे आदेश दिले होते. तसेच महाव्यवस्थापक वाहतूक विभाग, मुंबई यांच्याकडून यवतमाळ विभागीय नियंत्रक आणि आगार व्यवस्थापक उमरखेड यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे सुचवले होते. तथापि, या आदेशांनंतरही ट्रॅव्हल्सवर कोणतीही कार्यवाही केली गेली नाही. प्रादेशिक परिवहन विभाग आणि वाहतूक विभाग, उमरखेड यांच्या संबंधित अधिकाऱ्यांनी अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्सविरोधात कोणतीही ठोस कारवाई केली नाही, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढला आहे. या संदर्भात प्रशासनाने आता तात्काळ कार्यवाही सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. उमरखेड शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रशासनाने योग्य पावले उचलली पाहिजेत.

# शिस्त, सातत्य आणि आत्मविश्वासातूनच पोलीस भरतीत यश : प्रा.विठ्ठल कांगणे

प्रतिनिधी १९ जानेवारी

**यवतमाळ** : पोलीस भरतीत यश मिळवायचे असेल तर शिस्तबद्ध तयारी, सातत्यपूर्ण अभ्यास आणि मानसिक मजबुती या तीन बाबींवर विशेष भर देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रा. विठ्ठल कांगणे यांनी केले. डॉ. नंदुरकर विद्यालय, दारव्हा रोड, यवतमाळ येथे आयोजित पोलीस भरती मार्गदर्शन मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्याचे आयोजन वंचित बहुजन आघाडीचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष तसेच यवतमाळ नगरपालिकेचे नगरसेवक व गटनेते डॉ. नीरज वाघमारे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

प्रा. कांगणे यांनी पोलीस भरतीच्या



संपूर्ण प्रक्रियेवर सखोल मार्गदर्शन करताना सांगितले की, लेखी परीक्षा आणि शारीरिक चाचण्या या दोन्ही टप्प्यांसाठी समन्वयाने तयारी करणे गरजेचे आहे. "अनेक उमेदवार चुकीच्या पद्धतीने सराव करतात किंवा नियोजनाअभावी अपयशी ठरतात. अभ्यासाचे वेळापत्रक ठरवून, दररोज शारीरिक सराव केल्यास यश निश्चित आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

मानसिक तयारीवर भर देताना ते म्हणाले की, "अपयश आले तरी खचून न जाता आत्मविश्वास टिकवणे महत्त्वाचे आहे. संयम, सकारात्मक दृष्टिकोन आणि सातत्य या गुणांमुळेच स्पर्धा परीक्षेत यश मिळते." ग्रामीण व वंचित भागातील विद्यार्थ्यांना उद्देशून त्यांनी, "संधी कमी असल्या तरी मेहनतीला पर्याय नाही. योग्य मार्गदर्शन आणि स्वतःवरील विश्वास असेल, तर कोणतेही ध्येय गाठता येते," असे सांगितले.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून विविध अकादमींचे प्राध्यापक गजानन माळोदे, उमेश नगराळे, मनीष बुटले, सतीश आडे, प्रीतम माकोडे, नितेश मेश्राम, जगदीश वानखेडे, प्रमोद डेरे, नितीन आडे, निलेश उईके, केतकी पोटे उपस्थित होते. तसेच वंचित बहुजन आघाडीचे निर्वाचित नगरसेवक मीराताई वीर, संघपाल कांबळे, पायल कांबळे यांचीही उपस्थिती होती.

पक्षाचे कार्यकर्ते पुष्पा सिरसाट, प्रमोद पाटील, करुणा मून, सुकेशनी खोब्रागडे, विलास वाघमारे, इंजि. अशोक कयापाक, संजीव कुमार इंगळे, करुणा चौधरी, सविता तिडके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजि. अशोक कयापाक यांनी केले तर आभारप्रदर्शन संघपाल कांबळे यांनी मानले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि. १९ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## नवोदय विद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे...

वाशीम येथिल नवोदय विद्यालय येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवोदय विद्यालयाचे प्राचार्य श्री सचिन खरात सर हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री शाहू भगत, प्रमुख उपस्थिती नायब तहसीलदार श्री जी एस नप्ते सर, मंडळ अधिकारी श्री नप्ते, अग्निशमन पथकाचे श्री सुरोशे आदी मंडळी उपस्थितीत होते. यावेळी नवोदय विद्यालयातील विद्यार्थी यांना पूर, विज, आग, सर्पदंश, रस्ते अपघात, शाळा सुरक्षा, नैसर्गिक आपत्ती व मानव निर्मित आपत्ती व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन शाहू भगत यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य श्री सचिन खरात सर यांनी केले.याप्रसंगी श्री हर्षवर्धन बांगर, नायब तहसीलदार श्री जी.एस. नप्ते सर यांनी मनोगत व्यक्त केले. सदर प्रशिक्षणाला नवोदय विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व आपदा मित्र यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.



# महसूल विभागाच्या नाकावर टिच्चून रेतीची तस्करी जोमात !



## *वाहनांची धरपकड नावालाच, शासनाच्या महसूलाला चुना *अवैध रेती वाहतुकीची 'ब्रँडेड' बातमी







• खाजा शेख @रिसोड •

तालुक्यातील महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नाकावर टिच्चून रेतीची तस्करी जोमात सुरू आहे. रात्री आठ वाजता नंतर लोणार, लोणी, मोप मार्गे तर काही अवैध वाहने मोहजाबंदी, मांडावा, कुऱ्हा आदी बंदीसदृश भागातून बिनबोभाटपणे तालुक्यात शिरकाव करत आहेत. परिणामी मध्यंतरी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांची धरपकड ही केवळ नावालाच होती की काय ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मात्र या अवैध रेती तस्करीमुळे शासनाच्या महसूलाला चुना तर लागत आहेच, पण रेती तस्कर अव्वाच्या सव्वा भावात रेतीची विक्री करत असल्याने सर्व सामान्य नागरिकांची परवड होत असल्याचे बोलले जात आहे. शिवाय तालुक्यातील काही ठराविक दलाल महसूल प्रशासनासोबत संधान साधून रेती तस्करीचे नियोजन व्यवस्थित करत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. रात्री बेरात्री रेतीची अवजड वाहने सुसाट धावत असल्याने अपघाताची शक्यता तर बळावलीच आहे पण ग्रामीण भागातील रस्त्यांची सुद्धा वाट लागत असल्याचे वास्तव समोर येत आहे. या गंभीर बाबीकडे महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

गौण खनिजाबाबत प्रशासनाने कडक निर्बंध घातले असून विशेषतः रेती उपशाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. तालुक्यातील रेती घाटाचे लिलाव रखडून ठेवण्यात आले आहेत. तरीसुध्दा शेजारच्या लोणार व सेनगाव तालुक्यातून रिसोड तालुक्यात अवैध रेती वाहतूक बिनबोभाटपणे सुरू आहे. रात्रीबेरात्री बिनधास्तपणे रेती वाहतूक सुरू असून, सबंधित प्रशासनाच्या अर्थपूर्ण संबंधातून रेतीमाफिया ' सैराट ' झाले असल्याची चर्चा होत आहे. परिणामी चोरट्या रेतीचे दर बेभाव झाले असून चोरटी रेती सोन्याच्या भावात विकत असल्याची ओरड होत आहे.त्यामुळे गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांची व रोजगार हमी योजनेअंतर्गत सूरू असलेल्या सिंचन विहीर लाभार्थ्यांची पिळवणूक होत असल्याची विश्वसनीय सूत्रांनी माहिती दिली आहे. या गंभीर बाबीकडे महसूल प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने सर्व सामान्य जनता प्रशासनाप्रती प्रचंड रोष व्यक्त करत आहे.

तालुक्यात तळणी येथून लोणार मार्गे व हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव येथून रात्री बेरात्री रिसोड तालुक्यात रेतीची वाहतूक जोमात सुरू असल्याची माहिती हाती आली आहे. सदर अवैध रेती वाहतूक करणारे माफिया रेतीचे अव्वाच्यासव्वा दर लावून गरजवंतांची आर्थिक पिळवणूक करीत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. परिणामी शासन गोरगरिबांसाठी राबवित असलेल्या विवीध घराकुलांच्या योजनेतील लाभार्थी हतबल झाले आहेत.

अवैध रेतीचे भाव आठ ते दहा हजार प्रतीब्रॉस असल्याने गोरगरीब जनतेसाठी कुवती बाहेरचा ठरत आहे. त्यामुळे अनेक घराकुलांची कामे रेतीअभावी रखडली असून भिंती तर उभारल्या पण छत कसे बांधायचे हा गंभीर प्रश्न गरीब लभार्थ्यांपुढे उभा ठाकला आहे. तीच गत रोजगार हमी योजनेअंतर्गत सूरू असलेल्या सिंचन विहीर लाभार्थ्यांची असल्याचे बोलले जात आहे. पावसाळा तोंडावर आल्याने बहुतांश शेतकरी विहिरीचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी धडपडत आहेत. मात्र रेतीसाठी परवाना मिळत नसल्याचे बोलत आहेत. तर अवैध मार्गाने रेती घेण्यास परवडत नसल्याची ओरड होत आहे. त्यामुळे अनेक कामे अर्धवट अवस्थेत पडून आहेत. या गंभीर बाबीकडे महसूल प्रशासनाने लक्ष घालून अवैध मार्गाने येणाऱ्या चोरट्या रेतीचे भाव नियंत्रित करावेत. जेणेकरून सोन्याच्या भावात विकल्या जाणारी रेती गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांना विकत घेता येईल व रखडलेली कामे पूर्ण करता येतील. अन्यथा चोरट्या मार्गाने होत असलेली अवैध रेती वाहतुकीवर कडक कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

### निगराणी कडक तरीसुद्धा वाहतूक बेधडक

तालुक्यात अवैध रेती वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी महसूल प्रशासनाने अनेक वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असल्याचे सर्वश्रुत आहेच. तद्वतच चोरट्या मार्गाने होत असलेल्या अवैध वाहतूकीवर सबंधित प्रशासन रात्रंदिवस पाळत ठेवून असल्याचे बोलले जात आहे. तरीसुद्धा तालुक्यात रात्रीबेरात्री अवैध रेती वाहतूक सुरूच असल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे. परिणामी रेतीतील पाणी मुरते कुठे ? असा सवाल सामान्य नागरिक उपस्थित करीत आहेत. तद्वतच, रेतीमाफियांचे काही दलाल योग्य ती रसद संबंधितांना पुरवित असल्याचा गंभीर आरोप केला जात आहे. परिणामी अवैध रेती वाहतूक बेधडक सुरू असल्याचे बोलले जात आहे. मात्र यात चोरटी रेती सोन्याच्या भावात विकल्या जात असल्याने गोरगरिबांची आर्थिक पिळवणूक होत आहे. या गंभीर बाबीचा सबंधित प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात

### पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभा

• सिटी न्युज ब्युरो @वाशीम •




राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे आयोजित करण्यात आली आहे.

### संत श्री बिरबलनाथ महाराज यांचा यात्रा महोत्सव

• सिटी न्युज ब्युरो @केनवड •

मंगरुळनाथ चे नाथबाबा ची यात्रा म्हणजे मंगरूळपीर वाशांसाठी एक अनोखी सन आहे दिनांक चार ४/२/२०२६ ते १५/२/२०२६ पर्यंत भरणार आहे श्रीनाथ बाबा महाराजांचे दोन-तीन महिने अगोदर जाहीर करून तत्कालीन जिल्हाधिकारी आर एन बॅनर्जी तथा शासकीय अधिकारी वर्ग व हजारो जनसमुदाय समोर नियोजित तारीख व वेळ पौर्णिमा दिनांक ४/२/१९२८ शनिवार संध्या ६ वाजता योग्य विद्याच्या बळावर संजीवन जिवंत समाधी घेतली त्या समाधी दिवसानिमित्त पौर्णिमा दि. १/२/२६ रविवारला अभिषेक होम व पूजेचा कार्यक्रम होणार असून ११ वाजता कार्यक्रम होणार असून अकरा वाजता श्री बिरबलनाथ महाराज यांचे लघुचित्र ग्रंथाचे संगीतमय वाचन ह .भ.प .उत्तमराव पाटील गावंडे रा.वरुड यांच्या मधुर वाणीतून होणार आहे दिनांक १/२/२०२६ बुधवार ला सकाळी ९वा.संत 'श्री' ची महापूजा व अभिषेक कार्यक्रम होणार असून रात्री ७वा.जनाबाई महिला हरिपाठ मंडळ मंगरूळ नाथ यांचा हरिपाठ कार्यक्रम होणार असून दि६/२/२० शुक्रवार रोजी सकाळी १२ते सांय ५वाजे पर्यंत मंदिरातून महिला व पुरुष अशा दोन लाईन मधून महाप्रसाद वाटप कार्यक्रम होणारा असून जय हनुमान मंडळ वरुड बु. माप्रसाद वितरण व्यवस्था पाहणार आहेत भाविकांनी दरवर्षीप्रमाणे शांततेत प्रसाद घ्यावा अशी विनंती संस्थाकडून करण्यात आली आहे रात्री८ते १० इंडियन आयडॉल फेम अष्टपैलू चेतन सेवांकुर ऑर्केस्ट्रा रा केक उमरा यांचा जीवनाशी संघर्ष करणाऱ्या अंदमुले व मुलीच्या संचार सहित भावगीत व भक्ती गीतांचा सदाबहार कार्यक्रम होणार आहे दि. ७/२/२६ रोजी शनिवार रोजी सकाळी९ वाजता श्री बिरबलाथ महाराज यांच्या पालखीचे गावामध्ये मिरवणूक निघणार असून दु. १२ते १:३० वाजता मंदिरात श्री दहीहंडी व गोपालकाला ह भ प प्रतिभाताई पाटील आळंदीकर रा भुली यांचे मधुर वाणीतून तर श्री संत योगनाथ महाराज आकोट व श्री संत सयाजी महाराज येळाकेळी यांचे शुभ हस्ते होणार आहे संध्याकाळी६ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे भजनी भव्य खंजिरी भजन स्पर्धेचे आयोजन आयोजक संत श्री अवचित महाराज भजन स्पर्धा समिती मंगरूपीर यांनी केली आहे



## माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत मिळवलेले यश हे विद्यालयासाठी अभिमानास्पद - प्राचार्य खरात

### रौप्य महोत्सवी आठवणींना उजाळा

• सिटी न्युज ब्युरो @वाशीम •

जवाहर नवोदय विद्यालयाचा २५ वर्षांचा प्रवास हा गुणवत्ता, शिस्त आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा गौरवशाली इतिहास आहे. या प्रवासात माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत मिळवलेले यश हे शाळेसाठी अभिमानास्पद आहे. माजी विद्यार्थ्यांचे अनुभव, मार्गदर्शन आणि योगदान हे सध्याच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरते. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग सातत्याने मिळणे आवश्यक असून, अशा मेळाव्यांमुळे पिढ्यांमधील नाते अधिक दृढ होत असल्याचे प्रतिपादन विद्यालयाचे प्राचार्य सचिन खरात यांनी केले.

रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त पी.एम.श्री. जवाहर नवोदय विद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून प्राचार्य श्री. खरात बोलत होते.यावेळी जवाहर नवोदय विद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. मनीष पावसे (नेत्ररोग तज्ञ), डॉ. सचिन साळवे (नेत्ररोग तज्ञ), सारिका कंसरे (व्याख्याता), मनोहरराव नाईक (विज्ञान ज्युनियर कॉलेज, कोंडाळा महाली) तसेच विकी खोब्रागडे (क्रिकेट प्रशिक्षक) उपस्थित होते.या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याचे उद्दिष्ट माजी विद्यार्थ्यांना एका समान व्यासपीठावर एकत्र आणणे, परस्पर संबंध दृढ करणे आणि शाळेच्या सर्वांगीण विकासात त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे हे होते.उपप्राचार्य श्री. सुभाष लष्करी यांनी आपल्या भाषणात विद्यमान आणि माजी विद्यार्थ्यांमध्ये सतत संवाद आणि सहकार्याची गरज अधोरेखित केली.या रौप्य महोत्सवी माजी विद्यार्थी मेळाव्याच्या यशस्वी आयोजनात माजी विद्यार्थी प्रभारी राजेश कुमार ठाकूर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मेळाव्यादरम्यान माजी विद्यार्थ्यांनी आपले शैक्षणिक व व्यावसायिक अनुभव शेअर केले तसेच सध्याच्या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रम आणि सौहार्दपूर्ण संवादामुळे कार्यक्रम अधिकच संस्मरणीय ठरला.शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आणि सामूहिक सहभागाची प्रतिज्ञा घेऊन या रौप्य महोत्सवी माजी विद्यार्थी मेळाव्याचा उत्साहात समारोप झाला.




### आरंभिक बालसंगोपन व बालशिक्षण दिवस (ECCE) उपक्रमामध्ये

# जिल्हा राज्यात नंबर एक

### मागील आठ महिन्यापासून सातत्याने प्रथम स्थानावर कायम

• सिटी न्युज ब्युरो @वाशीम •

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अर्पित चौहान यांनी दिलेल्या निर्देशानुसार व जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री संजय गणवीर आरंभिक बालसंगोपन व बालशिक्षण दिवस (ण्ण्) उपक्रमामध्ये वाशिम जिल्हयाने राज्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे, व राज्यात सातत्याने अव्वल स्थान कायम ठेवले आहे,



वाशिम जिल्ह्यात रॉकेट लर्निंग संस्था आणि महिला व बालविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या १० तारखेला 'ईसीसीई दिवस' साजरा करण्यात येतो. या उपक्रमाअंतर्गत दर महिन्याला वेगवेगळ्या शैक्षणिक थीम अंगणवाडी सेविकांना देण्यात येतात आणि त्या थीमनुसार अंगणवाड्यांमध्ये विविध उपक्रम राबवले जातात.अंगणवाडी सेविका अत्यंत उत्साहाने हा दिवस साजरा करतात. यावेळी बालकांच्या विकासाशी संबंधित उपक्रम, पालकांचा सहभाग तसेच अंगणवाडीची शैक्षणिक भूमिका यावर विशेष भर दिला जातो. याचबरोबर रॉकेट लर्निंग संस्थेमार्फत देण्यात आलेल्या ऑनलाईन लिंकवर या उपक्रमांची संपूर्ण माहिती अंगणवाडी सेविकांकडून नियमितपणे भरली जाते.या उपक्रमाचा मुख्य उद्देश बालकांच्या पाचही विकासात्मक घटकांवर- शारीरिक, मानसिक, सामाजिक, भावनिक आणि बौद्धिक विकास-सर्वांगीण पद्धतीने काम करणे हा आहे. तसेच अंगणवाडी ही केवळ पोषण केंद्र नसून शिक्षणाचा पाया मजबूत करणारे महत्त्वाचे केंद्र आहे, ही भूमिका पालकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे आणि पालक व अंगणवाडी सेविका यांच्यात सकारात्मक व विश्वासपूर्ण नाते निर्माण करणे हाही या उपक्रमाचा महत्त्वाचा हेतू आहे.गेल्या आठ महिन्यांपासून वाशिम जिल्हा 'ईसीसीई दिवस' साजरी करण्यात संपूर्ण महाराष्ट्रात वाशिम अव्वल स्थान पटकावत आहे. चालू महिन्यात म्हणजेच १० जानेवारी रोजी सर्व केंद्रात ईसीसीई दिवस साजरा करण्यात आला असून

**सुविधा अनेक, झाले चेक, कारभार नेक,**

राज्यात प्रथम येण्याचा बहुमान वाशिम जिल्हा परिषद त मिळवला आहे ही बाब जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. या कार्यक्रमादरम्यान जानेवारी महिन्यात संपूर्ण वाशिम जिल्ह्यातून एकूण ९,४४० माता आणि ५,७५९ पिता उपस्थित राहिले. पालकांचा वाढता सहभाग अंगणवाडीतील उपक्रमांबाबत जागरूकता वाढत असल्याचे द्योतक असून जिल्ह्यातील पूर्वप्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता अधिक मजबूत होत असल्याचे चित्र यावरून स्पष्ट होते.

सदर उपक्रम यशस्वी राबविण्यासाठी जिल्हा समन्वयक स्नेहा वरकड तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी नितीन लुंगे, मदन नायक, अर्चना फाले, अमिता गिऱ्हे, अनुप कदम तसेच सर्व पर्यवेक्षिका व अंगणवाडी सेविका यांनी केलेल्या अथक परिश्रमामुळे केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्वच स्तरावरून अभिनंदन केले जात आहे.

# झाडे कापण्याआधी मस्तक कापा !

### डॉ.वैष्णव भांगडीया यांचा मुख्याधिकाऱ्यांना तीव्र हरकत अर्ज सादर

• सिटी न्युज ब्युरो @वाशीम •

येथून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ अकोला–हिंगोली रोड च्या नूतनीकरणाच्या नावाखाली प्रस्तावित करण्यात आलेल्या वृक्षतोडीविरोधात वाशिममध्ये तीव्र असंतोष व्यक्त होत असून, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक वैष्णव भांगडीया यांनी नगर परिषद वाशिमचे मुख्याधिकारी यांना अत्यंत कठोर शब्दांत हरकत अर्ज सादर केला आहे. 'एक-एक झाड म्हणजे एक-एक जीव आहे. झाडे कापण्याआधी आमचे मस्तक कापा,' अशा ठाम शब्दांत त्यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे.

सदर अर्जात भांगडीया यांनी नमूद केले आहे की, महामार्गाच्या दुतर्फा उभी असलेली अनेक झाडे ही अनेक दशकांपासून परिसराचा अविभाज्य भाग असून, त्यातील काही झाडे इंग्रजांच्या काळापासून अस्तित्वात आहेत. ही झाडे केवळ सावली देणारी नसून, प्रदूषण नियंत्रण, तापमान संतुलन, पावसाचे पाणी धरून ठेवणे, पक्षी व प्राण्यांचे संरक्षण आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. अशा ऐतिहासिक व जीवनदायी झाडांची तोड करणे म्हणजे भविष्यातील पिढ्यांचे नुकसान करण्यासारखे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.



वैष्णव भांगडीया यांनी प्रशासनाकडे ठाम मागणी केली आहे की, तीन वर्षांपेक्षा अधिक वय असलेले एकही झाड कोणत्याही परिस्थितीत तोडण्यात येऊ नये. तसेच तीन वर्षांखालील झाडे असतील तर ती तोड न करता नियमानुसार व शास्त्रीय पद्धतीने स्थलांतरित करण्यात यावीत. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा बळी देणे ही असंवेदनशील व चुकीची भूमिका ठरेल, असा आरोपही त्यांनी केला आहे. जर प्रशासनाने या हरकतीकडे दुर्लक्ष करून एकाही झाडाची तोड केली, तर चिपको आंदोलन करून प्रत्यक्ष झाडांना मिठी मारून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. यासोबतच तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन, रस्ता रोको तसेच पर्यावरण रक्षणासाठी आमरण उपोषण करण्यात येईल, आणि त्यानंतर उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस संपूर्णपणे प्रशासन जबाबदार राहील, असेही अर्जात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक या नात्याने वैष्णव भांगडीया यांनी संघाच्या पंच परिवर्तन या संकल्पनेतील एका महत्त्वाच्या परिवर्तन म्हणजे पर्यावरण संरक्षण या विषयावर विशेष भर दिला आहे. त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रत्येक स्वयंसेवकाला पर्यावरण रक्षणाच्या या लढ्यात सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन करत, 'प्रत्येक स्वयंसेवकाने झाडे वाचविण्यासाठी रस्त्यावर उतरून लढाई लढावी,' असे स्पष्ट आवाहन केले आहे.

या निवेदनामुळे शहरात वृक्षतोडीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पर्यावरणप्रेमी नागरिक, स्वयंसेवक व विविध सामाजिक संघटनांनी या भूमिकेला पाठिंबा दर्शवण्यास सुरुवात केली आहे. आता प्रशासन या गंभीर हरकतीवर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## माँ गंगा नर्सिंग कॉलेज येथे रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यशाळा

• सिटी न्युज ब्युरो @वाशीम •

माँ गंगा नर्सिंग कॉलेज, वाशीम येथे आज रस्ता सुरक्षा विषयावर विशेष जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सुमारे १५० विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सदर उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी माँ गंगा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. हरीश बाहेती होते. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. दिपक सिंगल तसेच लाहोटी ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक राजू लाहोटी यांची प्रमुख उपस्थिती होती.

दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करणे, दुचाकी रस्त्याच्या डाव्या बाजूनेच चालविणे, कारमध्ये प्रवास करताना सीट बेल्ट वापरणे, मद्यपान करून वाहन चालवू नये, अतिवेग टाळावा तसेच ओव्हरटेक करताना योग्य बाजूने व सावधगिरीने करावा, यावर त्यांनी विशेष भर दिला.



तसेच रस्ता ओलांडताना प्रथम उजव्या बाजूकडे, नंतर डाव्या बाजूकडे पाहून वाहन येत नसल्याची खात्री करूनच रस्ता ओलांडावा, अपघातग्रस्त व्यक्तींना तात्काळ मदत करावी आणि प्रत्येकाने वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून अपघात टाळण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन घनवट यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन श्री. पठाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून, अशा उपक्रमांमधून तरुणांमध्ये जागरूकता निर्माण होणे काळाची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# प्रभागातील समस्या सुटल्या नाही तर शिवसेना स्टाईल आंदोलन



प्रतिनिधी १९ जानेवारी

## ♦ सागर भारूका यांचा इशारा

**अकोला :** प्रभाग १२ मधून निवडून आलेले उद्धव सेनेचे नगरसेवक सागर भारुका यांनी आज अकोला महानगरपालिका मध्ये आक्रमक एन्ट्री घेतली. मनपा आयुक्तांची भेट घेतली.

निवडून आल्याच्या पहिल्या दिवसा पासून प्रभाग १२ मध्ये सागर भारुका यांनी नागरिकांच्या समस्या सोडवण्याचे काम सुरू केले आहे. विकास कामात महानगरपालिकेच्या काही अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

मनपा मधील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी प्रभागात कामे वेळेवर न केल्यास त्यांना शिवसेना स्टाईल धडा शिकविण्यात येईल असा इशारा त्यांनी विकास कामा संदर्भात दिला आहे.

◆प्रभागात स्वच्छता तसेच नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडविण्यास सागर भारूका यांनी प्राधान्य दिले आहे. याबाबत कुठल्याही प्रकारे हयगय होऊ नये अशी भूमिका भारूका यांची आहे. वेळेत कामे होणे आवश्यक आहे असे ते म्हणाले

# शहरातील पॉश एरियात मतदानाबद्दल उदासीनता

## ♦ संमिश्र वस्तीत मात्र मोठ्या संख्येने मतदान



प्रतिनिधी १९ जानेवारी

**अकोला :** : मतदानाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी अकोला महानगरपालिकेने मोठी मोहीम सुरू केली. जागरूकता निर्माण करण्यासाठी महापलिकेचे कर्मचारी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत होते. आकर्षणाचे साधन म्हणून सेल्फी पॉइंट देखील उभारण्यात आले होते. स्थानिक लोककलावंतांची मदत सुद्धा घेण्यात आली होती. या मोहिमेवर लाखो रुपये खर्च करण्यात आले, परंतु त्याचा शहरातील व्हीआयपी क्षेत्रांवर कोणताही विशेष परिणाम झाला नाही. व्हीआयपी आणि पॉश क्षेत्र मानल्या जाणाऱ्या जठार पेठ उमरी रामदास पेठ सिव्हिल लाईन गोरक्षण रोड कौलखेड मध्ये सर्वात कमी मतदान झाले. रामदास पेठ परिसरात ९१०६ मतदारांनी मतदान केले. तर जठारपेठ परिसरातील ११२१९, सिव्हिल लाईन परिसरातील ११,१५९ नागरिकांनी गौरक्षण रोड येथील ११९०३ नागरिकांनी तर कौलखेड परिसरातील १३२७८ नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला या सर्व प्रभागातील मोठा भाग आमदार रणधीर सावरकर यांच्या मतदारसंघात येतो.

### संमिश्र वर्गाच्या भागात चांगले मतदान झाले

याउलट, संमिश्र वर्गाच्या भागात मानल्या जाणाऱ्या मलकापूर, हरिहर पेठ, वाशिम रोड, पी के व्ही, दाबकी रोड, नायगाव, अकोट फाईल, तार फाईल, शिवाजीनगर, आधी प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणात मतदान झाले. प्रभाग १८ वाशिम रोड मध्ये १८९९८, तर मलकापूर परिसरात १८,६९० प्रभाग १७ हरिहर पेठ मतदारसंघात १७ हजार ९९८ अशा मोठ्या प्रमाणात नागरिकांनी मतदान केले. या भागात कामगारांची तसेच संमिश्र नागरिकांची संख्या जास्त असल्याचे मानले जाते. त्याचप्रमाणे, शिवाजीनगर पीकेव्ही तार फाईल सिंधी कॅम्प आधी प्रभागांमध्ये व्हीआयपी झोनच्या तुलनेत लक्षणीयरीत्या जास्त मतदान झाले. या सर्व झोनमध्ये मतदानाची टक्केवारी ५५ टक्क्यांहून अधिक होती. प्रत्येक निवडणुकीत मतदान जागरूकता मोहिमा आयोजित केला जातात प्रशासन विविध कार्यक्रम आयोजित करण्यासाठी लाखो रुपये खर्च करते परंतु पॉश भागात मतदानाची टक्केवारी नेहमीच कमी असल्याचे उघड झाले आहे उमेदवारांनी मतदारांना मतदान केंद्र। पर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था केल्यावरही पॉश एरियातील नागरिक मतदानासाठी उदासीन असल्याचे दिसून आले तर दुसरीकडे शहरातील संमिश्र तसेच कामगारांची वस्ती असलेल्या प्रभागांमध्ये मात्र नागरिक स्वयंस्फूर्तीने मतदानासाठी मतदान केंद्रावर मोठ्या संख्येने पोहोचत असल्याचे दिसून आले त्यामुळे या प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याचे दिसून आले तर दुसरीकडे महापालिकेने मतदानाच्या जनजागृतीसाठी लाखो रुपये खर्च करून प्रयत्न केल्यावरही पॉश आणि सुशिक्षित एरियातील नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदानाकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले.

# रथसप्तमीनिमित्त यात्रा महोत्सव, अखंड हरिनाम सप्ताह !

प्रतिनिधी १९ जानेवारी

**अकोला :** रथसप्तमीनिमित्त यात्रा महोत्सव, अखंड हरिनाम सप्ताह १९ जानेवारी ते सप्ताहात कीर्तनकारांची रविवार, २५ जानेवारीपर्यंत विश्वनाथ महाराज सेवा संस्थान निमकर्दा येथे आयोजित करण्यात आला आहे.



जय भवानी मंडळ भागवत सप्ताह यांच्या वतीने ग्रंथराज विश्वजीवन ग्रंथ पारायण हभप नाथ कृपावंत महाराज निमकर्दा, यांच्या हस्ते तीर्थ स्थापनेने कार्यक्रमाची सुरुवात होऊन गोपालकाला २५ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता तसेच दहीहंडी २६ जानेवारी रोजी सकाळी ५ वाजता होणार आहे. यानिमित्त हभप विश्राम महाराज पांडे, हभप बंडू महाराज भाकरे, हभप मधुसूदन महाराज पोहरे, हभप अजाबराव महाराज, हभप गणेश महाराज इंगळे, हभप संस्कार महाराज लोडम, बाल कीर्तनकार तसेच गोपाल महाराज ओरडकर मोरगाव यांच्या काल्याच्या कीर्तनाने सुरुवात होणार आहे. दास प्रभू स्व. सुधाकरराव ठावरे यांच्या प्रेरणेने सुरू झालेले हे कार्यक्रम यामध्ये हभप माणिकराव लोंढे, हभप दत्तात्रय कीर्तने, हभप कीर्तनराव खारोटे, हभप प्रकाशराव खडसे, हभप उमेश वाघ, हभप किसनराव वाघ, हभप भारत वाघ, रामभाऊ हभप नीळकंठ, हभप ज्ञानेश्वर लाखे तसेच अडोशी-कडोशी, सादीजन, निमकर्दा येथील भजनी मंडळ आपली सेवा प्रदान करणार आहेत. या कार्यक्रमांचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रविकांत इंगळे, माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, विजय अग्रवाल, सुनीता अग्रवाल, बाळू पाटील ताथोड, रामदास शेंडे, गजानन वजिरे, दिवाकर इंगळे, रमेश सातारकर, महादेवराव पाकधने, गुरुदेव परिवार यांनी केले आहे.

# बटवाडी शिवारात बिबट्यांचे दर्शन



प्रतिनिधी १९ जानेवारी

**बाळापूर :** तालुक्यातील बटवाडी शिवारात रविवारी सकाळी दोन बिबट्यांचे दर्शन झाले. त्यामुळे शेतकरी तसेच आजुबाजूच्या लोकांमध्ये दहशत पसरली. या बाबतीत वन विभागाला माहिती दिली आहे. शेतात सध्या रब्बीची कामे सुरू आहेत. आणि बिबटे दिसल्यामुळे शेतकरी धास्तावले आहे. विशेष म्हणजे बिबटे दिसल्याचे दृश्य व्हायरल झाले. बिबट्यांपासून बटवाडी आणि परिसराला भयमुक्त करावे अशी मागणी केली जात आहे.

# नगरपरिषदेत सैन्यदलात निवड झालेल्या युवतींचा सत्कार

प्रतिनिधी १९ जानेवारी



**हिवरखेड:** नगरपरिषद मध्ये १९ जानेवारीला सकाळी सैन्यदलात निवड झालेल्या युवतींचा सत्कार करण्यात आला. नगराध्यक्षा सुलभा दुतोंडे, उपाध्यक्षा प्रतिभा येऊल यांच्यासह सर्व नगरसेवक नगरसेविका उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

नगरसेविका प्रमिला मानकर, वंदना वानखडे, वैशाली वानखडे, अनिता वाकोडे, दीपाली इंगळे यांच्यासह नगरसेवक दीपक रायबोले, किरण सेदानी,अजीज खा, प्रथमेश नाठे, दानिश खान, वैभव गावंडे, उपस्थित होते. सैन्यदलात निवड झालेले रोहित येनकर, वैभव भालतिलक, अनिकेत निबोकार, ऋषीकेश कौसकार, मयुर व्यवहारे, शिवानी वाकोडे, निकिता गावंडे, चतुर्थी हागे यांचा सत्कार झाला. पोलिस भरती, आर्मी भरतीसाठी विद्यार्थ्यांना अभ्यासिका व क्रीडांगण उपलब्ध करून दिले तर सोयीचे होईल अशी मागणी केली.

उपस्थित नगरसेवक नगरसेविका यांनी विद्यार्थ्यांना ग्वाही दिली आमच्या या काळात नक्कीच आम्ही विद्यार्थ्यांचा हा प्रश्न सोडवू. रमेश दुतोंडे, संदीप इंगळे, रविंद्र वाकोडे, दशरथ गावंडे, गणेश वानखडे, संदीप इंगळे, बाबुराव वाकोडे, नंदकिशोर कोस्कार, मंगेश दुतोंडे, केशव कोरडे, गणेश राठोड, योगेश दुतोंडे,अर्जुन खिरोडकार, सुलभा गावंडे, छाया कौसकार तसेच विद्यार्थ्यांचे पालक, नागरिक उपस्थित होते.

# पंतप्रधानांच्या 'ज्ञान भारतम' संकल्पनेला बळ देणारा भारतीय ज्ञान महोत्सव-2026 यशस्वी

प्रतिनिधी १९ जानेवारी



**अकोला :** पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या 'ज्ञान भारतम' संकल्पनेला तसेच केंद्र शासनाच्या भारतीय ज्ञान प्रणाली उपक्रमाला बळ देणारा भारतीय ज्ञान महोत्सव-२०२६ अंतर्गत बक्षीस वितरण सोहळा १८ जानेवारी रोजी दीप अँटीक्स म्युझियम, बाभुळगाव अकोला येथे उत्साहात पार पडला.

अवनी ग्लोबल फाउंडेशन, अकोला व दीप अँटीक्स म्युझियमच्या वतीने १ ते १० जानेवारी दरम्यान जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. या महोत्सवाची संकल्पना व प्रेरणा कुशल सेनाड यांची होती. कार्यक्रमाची सुरुवात आशिष उमाळे यांच्या बासरीवादनाने करण्यात आली. या ज्ञानमहोत्सवात भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित ७२८ प्रतिकृती, १२७३ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, १८५ मार्गदर्शक शिक्षकांचे समर्पित योगदान तसेच ३० शाळांमधील ३५ परीक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत आयकेएस च्या उद्दिष्टांशी सुसंगत ठरला. बक्षीस वितरण सोहळ्याचे उद्घाटन प्रदीप नंद व सौ. दिपाली नंद यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. सतीश फडके होते. या सोहळ्यास, आ. रणधीर सावकार, सौ. मंजुषाताई सावरकर, सौ. सुहासिनीताई धोत्रे, डॉ. विजय नानोटी, डॉ. अनिल फोकमारे, इंजि. काजल राजवैद्य, डॉ. माधव देशमुख व सौ. इंद्राणी देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. महोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत परीक्षकांचे नियोजन व समन्वयाची जबाबदारी सौ. वैजयंती पाठक व जयमाला खेडकर यांनी नियोजनबद्धरीत्या पार पाडली. कार्यक्रमाला संजय शर्मा, अर्चना शर्मा, अॅड. गिरीश गोखले, विनोद जकाते, यशवंत सवई, अमित सबनीस, गीता खेतान, मयूर सोमटकर, सुनील नंद जयंत पडगीलवार, सुधाकर देशमुख, राज पाटील, श्रीकांत देशपांडे, शलेंद्र व्यास, जयंत मराठे,विजय मोहरीर व अश्विनी कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी डॉ. राजेश जोशी यांनी सादर केलेला एरोमॉडेलिंग शो विशेष आकर्षण ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी मोकळे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देणे,'ज्ञान भारतम्'च्या माध्यमातून आत्मनिर्भर व सांस्कृतिकदृष्ट्या सशक्त भारत घडविणे, तसेच शिक्षक व मार्गदर्शकांच्या योगदानाचा सन्मान करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी नमूद केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन अवनी ग्लोबल फाउंडेशनच्या अध्यक्षा अमृता सेनाड व समन्वयक डॉ. माधवजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. उपस्थित पालक, शिक्षक, विद्यार्थी व मान्यवरांनी हा उपक्रम आयकेएस आधारित शिक्षणासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाची सांगता नेहल ठाकूर च्या वंदे मातरम ने केल्या गेली.

# ई-पीक पाहणीला सुरुवात, नोंदणीसाठी 24 जानेवारी पर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी १९ जानेवारी

**अकोट:** अकोट तालुक्यातील रब्बी पीक हंगामातील पिकांची नोंदणी करण्यासाठी शासनाने 'ई-पीक पाहणी' मोहिमेला सुरुवात केली आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी २४ जानेवारी २०२६ पर्यंत शेतातील पिकांची ऑनलाइन नोंदणी पूर्णकरणे बंधनकारक आहे. विहित मुदतीत नोंदणी न केल्यास सातबाऱ्यावरील पीकाचा रकाना हा कोरा राहील. यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना पीकविमा किंवा कोणतीही नैसर्गिक आपत्ती,मदत,मिळणार नाही व शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे.महसूल विभागाने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी 'ई-पीक पाहणी २.०.१५ हे नवीन मोबाइल अँप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करून दिलेले आहे.शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतात (बांधावर) जाऊन या अँपद्वारे आपल्या शेतातील पेरलेल्या पिकाची माहिती अपलोड करायची आहे.यामुळे सातबाऱ्यावर अचूक नोंद होऊन पारदर्शकता येणार आहे.

ज्या शेतकरी बांधवांकडे अँड्रॉइड मोबाइल उपलब्ध नाही किंवा ज्यांना अँप वापरताना तांत्रिक अडचणी येत आहेत.त्यांच्यासाठी महसूल विभागाने विशेष व्यवस्था केली आहे.संबंधित गावचे तलाठी,कोतवाल,किंवा गावात नियुक्त करण्यात आलेले मदतनीस यांची शेतकरी मदत घेऊ शकतात.

अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीपिकांचे नुकसान झाल्यास शासकीय मदत मिळण्यासाठी सातबाऱ्यावर पिकाची नोंद असणे गरजेचे आहे.जर नोंदणी केली नाही तर सातबारा कोरा राहील.त्यामुळे पीक विम्याचा लाभ घेतांना शेतकऱ्यांना अडचणी येतील.ही बाब लक्षात घेऊन अकोट तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी २४ जानेवारीपूर्वी आपल्या शेतातील पिकाची नोंदणी पूर्ण करावी असे आवाहन तहसीलदार डॉ.सुनील चव्हाण यांनी केले आहे.

# जलाशयांवर पक्ष्यांची संख्या रोडावली

प्रतिनिधी १९ जानेवारी

## ♦ पक्षी निरीक्षकांचा भ्रमनिरास



**अकोला :** हिवाळ्यात सैबेरियन तसेच युरोपातून स्थलांतरित पक्षी जिल्ह्यातील विविध जलाशयांवर हजेरी लावतात. पक्षी निरीक्षणासाठी पक्षी निरीक्षक, अभ्यासक पहाटे पासून पाणवठ्यावर दिसतात. परंतु, हवामान बदलामुळे पक्ष्यांची संख्या कमी दिसते. त्यामुळे निरीक्षकांचा भ्रमनिरास होत आहे.

काही वर्षापासून पक्ष्यांच्या अधिवासाच्या परिसरातील वाढते बांधकाम, लोकवस्ती, मानवी हस्तक्षेप, वाढते प्रदूषण आणि हवामानातील बदलामुळे आदींचा विपरीत परिणाम पक्ष्यांच्या स्थलांतरावर झाल्याचे दिसते. यंदा तर जानेवारीचा तिसरा आठवडा सुरू झाला तरी जलाशयांवर पक्षी त्या प्रमाणात दिसून येत नाही. जिल्ह्यातील कापशी



तलाव, काटेपूर्णा प्रकल्प, आखतवाडा तलाव तसेच विविध जलाशयांवर तलवार बदक, थापट्या, चक्रांग, काष्ठ तुतवार, मोठ्या ठिपक्यांचा गरूड, भुबई बदक, छोटा पाणलावा, लाल डोक्याचा रेडवी, करड्या मानेचा रेडबी, पांडुरक्या भोवल्या, कंठेरी चिखल्या, राजहंस यासारखे पक्षी युरोपातून स्थलांतर करून दाखल होतात. मात्र, यंदा काही मोजक्याच पाहुण्या पक्ष्यांनी जलाशयांवर हजेरी लावलेली आहे. ब्लू टेल बी इटर, थापट्या, काही प्रमाणात तलवार बदक, रेड क्रिस्टेड पोचार्ड, तलवार बदक, पेन्टेड स्टॉर्क, ब्राह्मणी यासारखे काही मोजकेच पक्षी जलाशयावर पाहायला मिळत आहे असे पक्षी निरीक्षकांचे मत आहे.

# रेल येथे ग्राम स्वच्छतेचे धिंडवडे, मूलभूत सुविधांचाही अभाव

वि प्रतिनिधी १९ जानेवारी

**कुटासा :** एकीकडे शासन गावे स्वच्छ व स्वयंपूर्ण करण्यासाठी विविध योजना राबवत असताना अकोट पंचायत समितीमधील ग्राम रेल येथे गावात स्वच्छता पिण्याचे शुद्ध पाणी व सांडपाणी यांची योग्य विल्हेवाट या तिन्ही मूलभूत सुविधांचा अभाव दिसत असून या गावात दिवसेंदिवस गटांचा विकास होऊन ग्राम स्वच्छतेचे धिंडवडे उडताना दिसत आहेत.गावात बहुतांश ठिकाणी सांडपाणी वाहून नेणारी गटार व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून यामुळे डासांची उत्पत्ती वाढत आहे परिणामी पसरणाऱ्या रोगांविषयी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असले तरीही ग्रामपंचायत प्रश्नाला याचे काहीच देणे घेणे नसल्याचे दिसून येते.या गावात घनकचरा व्यवस्थापनाचे कामही केवळ निधी लाटण्यासाठीच झाल्याचे गावात बोलले जाते कचरा विलगीकरण शेड गावात नसून गावा बाहेर कुठेतरी बांधल्याची चर्चाही गावात आहे तसेच शोषखड्डे अनावश्यक ठिकाणी व निकृष्ट स्वरूपाचे बांधल्याचाही गावातील सुज्ञ नागरिक आरोप करत असले तरी संबंधित गटविकास अधिकारी यांनी गावात येऊन चौकशी केल्यास खरे काय हे सर्वांसमोर येईलच.



लाखो रुपये खर्चून लिकेज जैसे थे ग्राम रेल येथे गेल्या दोन वर्षात गावातील पिण्याच्या पाण्याचे पाईपलाईन व वाल लिकेजवर लाखो रुपये खर्च केले गेल्याचे समजले तरीही समस्या कायम आहे.

तात्पुरता मुरूम टाकून लाटला निधी रेल येथील जिल्हा परिषद मराठी शाळा येथे खडीकरण करण्याच्या नावावर अंदाजपत्रक बनवले व अतिशय कमी मुरूम टाकून त्याची जास्त खर्चाची एम बी बनवली व निधी लाटला असा रेल येथील ग्रामपंचायत सदस्यांचा आरोप असला तरी याविषयी संबंधित गटविकास अधिकारी यांनी सखोल चौकशी करावी व दोशींवर कारवाई करावी अशी मागणी आहे.

◆आम्ही अनेकदा गटार समस्या विषयी मासिक मीटिंगमध्ये विषय मांडतो काही ठिकाणच्या कामाविषयी ठराव व कामाचे टेंडर होऊन नऊ महिने झाले तरीही संबंधित ठेकेदार काम करण्यास उत्सुक दिसत नाही. त्यामुळे आम्ही सदर ठेकेदाराचे कंत्राट रद्द करून नव्याने टेंडर काढण्याचे सुचवले परंतु सरपंच सचिव हे कंत्राट रद्द करण्यासाठी दिरंगाई का करीत आहेत हे समजणे कठीण झाले आहे.

**हर्षल कोल्हे,** ग्रामपंचायत सदस्य रेल

CLASSIFIED

अकोल्यात आता नव्याने सुरू

द पाटील फ्रुड सेंटर चायनिज

येथे तुम्हाला सर्व प्रकारचे चायनिज, नुडल्स,मनचुरियन्स राईस लालीपॅप मिळेल. वेळः सायंकाळ ४ ते रात्री ११ वार्जपर्यंत होमडिलीवर उपलब्ध आणि प्राईज फक्त ७० रुपयापासून सुरू , मग सर्वांनीच एकदा जाऊन आनंद घ्या!

-:आमचा पत्ता:-

पाटील फ्रुड सेंटर

बारा जोतिलिंग रोड जवळ करोटे ज्वेलर्स जठारपेठ चौक,अकोला

प्रतिक हिंगणकर

Mo. 7378444488

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK